राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक - १७४१/२०२४
बोर्ड क्र. ७

श्री.मरकड अंकुशराव दादाराव,
मु.पो.गोंदी ता.अंबड जि.जालना — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा तलाठी,
तलाठी सजा गोंदी, ता.अंबड जि.जालना — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार,
तहसिल कार्यालय, अंबड जि.जालना — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक १७.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दि.२१.०२.२०२३ रोजीच्या माहिती अर्जाद्वारे शेतकरी अनुदान बाबत माहिती मागितलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, आज रोजी सुनावणी करीता अपिलीर्थी अनुपस्थित आहेत. मात्र, त्यांनी आयोगाकडील दाखल द्वितीय अपील प्रयोजनामध्ये माहिती न दिल्याबाबत, आदेश काढला नाही, असे कारण नमुद केलेले आहे. अभिलेखावरून दिसुन येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाद्वारे मोघम स्वरूपाची माहिती मागितलेली आहे. तसेच मागणी केलेल्या माहितीमध्ये आयोगास कोणतेही व्यापक जनहित दिसुन येत नाही. त्यामुळे अशी माहिती अपिलार्थी यांना देय होणार नाही, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(स्वाक्षरी)
(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.---6903--- दिनांक :- 26/06/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक - ११३७/२०२४, ४३६६/२०२४
बोर्ड क्र. ०८, ०९

श्री.रमेश देवाजी चव्हाण,
रा.आंबेडकर नगर, जाफ्राबाद,
ता.जाफ्राबाद जि.जालना. — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार,
तहसिल कार्यालय, जाफ्राबाद जि.जालना — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार,
तहसिल कार्यालय, जाफ्राबाद जि.जालना — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक १७.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दि.१७.११.२०२३ व ०३.०१.२०२४ रोजीच्या दोन्ही माहिती अर्जाद्वारे संजय गांधी निराधार योजना, श्रावण बाळ योजना व इतर योजना लाभधारकांना अनुदान रक्कम बँकेमार्फत वाटप करण्यात आली त्या सर्व लाभार्थ्यांची नांव, गांव, प्रत्ये प्रत्येक लाभार्थी रक्कम बँकेच्या नावासहीत प्रमाणीत प्रतीबाबत माहिती मागितलेली आहे.

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी कथन केले की, माहिती अर्जाच्या अनुषंगाने आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपावेतो उपलब्ध करून दिलेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्याने ती उपलब्ध करून देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांना माहिती अर्जाच्या अनुषंगाने आवश्यक असलेल्या माहितीकरीता शुल्काबाबत कळविण्यात आलेले आहे. तथापि अपिलार्थी यांनी शुल्काचा भरणा न केल्याने त्यांना माहिती उपलब्ध करून देण्यात आलेली नाही. आज रोजी सदर माहिती सोबत आनलेली असुन आयोगाच्या निर्देशानुसार अपिलार्थीस माहिती उपलब्ध करून देण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, आज रोजी सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या निर्देशानुसार अपिलार्थी यांना माहिती अर्जाच्या अनुषंगाने आवश्यक असलेली माहिती उपलब्ध करून दिलेली आहे व ती

अपिलार्थी यांनी स्विकारलेली आहे. हि बाब विचारात घेता, विचाराधिन द्वितीय अपील निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6906 दिनांक : 26/06/2025

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक - २३४४/२०२४
बोर्ड क्र. १०

श्री.शिवाजी भाऊराव बनकर, — अपिलार्थी
मु.बुटखेडा पो.अकोला देव, ता.जाफ्राबाद जि.जालना.

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा तलाठी, : उत्तरवादी क्र.१
तलाठी सजा अकोला देव, ता.जाफ्राबाद जि.जालना

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार, : उत्तरवादी क्र.२
तहसिल कार्यालय, जाफ्राबाद जि.जालना

(सुनावणी दिनांक १७.०६.२०२५)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दि.३०.१०.२०२३ रोजीच्या माहिती अर्जाद्वारे बुटखेडा शिवारातील जमीन भोगवटदारचे नाव सरकार शिव तत्कार गट नं.२४२ क्षेत्र ४ हेक्टर ४२ आर क्षेत्रातील अतिक्रमणबाबत माहिती मागितलेली आहे.

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी कथन केले की, माहिती अर्जाच्या अनुषंगाने आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपावेतो उपलब्ध करून दिलेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्याने ती उपलब्ध करून देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांना माहिती अर्जाच्या अनुषंगाने आवश्यक असलेली माहिती दि.३१.०१.२०२४ रोजी व्यक्तीश: उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. त्यामुळे विचाराधिन द्वितीय अपील निकाली काढण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, सुनावणी दरम्यान झालेला युक्तीवाद व उपलब्ध कागदपत्रावरून, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दि.३१.०१.२०२४ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थी यांना व्यक्तीश: माहिती उपलब्ध करून दिल्याचे दिसुन येत आहे. सदर पत्रावर अपिलार्थी यांची पोच आहे. हि बाब विचारात घेता, अपिलार्थी यांच्या युक्तीवादात आयोगास कोणतेही तथ्यांश दिसुन येत नसल्याने विचाराधिन द्वितीय अपील निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.----6907---------- दिनांक :- 26/06/2025

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक - ४९९२/२०२४

बोर्ड क्र. ११

सौ.राधा अरूण इंगळे, — अपिलार्थी
रा.देऊळगांव राजा माही, ता.देऊळगांव राजा जि.बुलढाणा.

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा तलाठी, : उत्तरवादी क्र.१
तलाठी सजा वरूड बु., ता.जाफ्राबाद जि.जालना

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार, : उत्तरवादी क्र.२
तहसिल कार्यालय, जाफ्राबाद जि.जालना

**(सुनावणी दिनांक १७.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी यांचे प्रतिनिधी, जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दि.०२.१०.२०२३ रोजीच्या माहिती अर्जाद्वारे मौजे वरूड बु.ता.जाफ्राबाद जि.जालना येथील भुमीखाली खातदार नामदेव देवराव कुरडेल यांना भावहिस्सा वाटणीपत्रकाप्रमाणे त्यांचे नावे एकुण किती शेतजमिन वाटणीच्या फेर फार प्रमाणित प्रत व इतरबाबत माहिती मागितलेली आहे.

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी कथन केले की, माहिती अर्जाच्या अनुषंगाने आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपावेतो उपलब्ध करून दिलेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्याने ती उपलब्ध करून देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने कार्यालयात अभिलेख स्वरूपात उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थी यांना दि.१३.०१.२०२४ रोजीच्या पत्राद्वारे उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. त्यामुळे विचाराधिन द्वितीय अपील निकाली काढण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, सुनावणी दरम्यान झालेला युक्तीवाद व उपलब्ध कागदपत्रावरून, अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने कार्यालयीन अभिलेखात उपलब्ध असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी दि.१३.०१.२०२४ रोजीच्या पत्राद्वारे नोंदणीकृत टपालाद्वारे उपलब्ध करून दिल्याचे दिसुन येत आहे. हि बाब विचारात घेता, अपिलार्थी यांच्या युक्तीवादात आयोगास कोणतेही तथ्यांश दिसुन येत नसल्याने विचाराधिन द्वितीय अपील निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.---6902--- दिनांक :-26/06/2025

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले द्वितीय अपील

---

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर -४३१००१

श्री.प्रविण सुभाष पिंपळे, : अपिलार्थी
रा.सोनगीर पो.वरूड बु. ता.जाफ्राबाद जि.जालना.

विरुध्द

| बोर्ड क्र. | द्वितीय अपील क्र. | जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचा तपशिल | | |
|---|---|---|---|---|
| १२ ते १६ | २३०५,५९८३ ते ५९८५/२०२४ | जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, जाफ्राबाद जि.जालना<br>प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार, तहसिल कार्यालय, जाफ्राबाद जि.जालना | उत्तरवादी क्र.१<br>उत्तरवादी क्र.२ | उपस्थित<br>प्रतिनिधी उपस्थित |
| ४२ | ९५३/२०२४ | जन माहिती अधिकारी तथा जिल्हा खनिकर्म अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना<br>प्रथम अपिलीय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना | उत्तरवादी क्र.१<br>उत्तरवादी क्र२ | अनुपस्थित<br>अनुपस्थित |
| ४८ | ५९८७/२०२४ | जन माहिती अधिकारी, उपविभागीय अधिकारी कार्यालय, भोकरदन जि.जालना<br>प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, भोकरदन जि.जालना | उत्तरवादी क्र.१<br>उत्तरवादी क्र.२ | अनुपस्थित<br>अनुपस्थित |
| ४९ | ५९८८/२०२४ | जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकुन (महसुल), जिल्हाधिकारी कार्यालय, जालना<br>प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार (महसुल), जिल्हाधिकारी कार्यालय, जालना | उत्तरवादी क्र.१<br>उत्तरवादी क्र.२ | अनुपस्थित<br>अनुपस्थित |

**(सुनावणी दिनांक १७.०६.२०२५)**

**निर्णय**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपिल दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. आज रोजी सुनावणी करीता अपिलार्थी उपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रावरून, अपिलार्थी यांनी एकुण ८ माहिती अर्जाद्वारे खालीलप्रमाणे माहिती मागितल्याचे दिसुन येत आहे.

| बोर्ड क्र. | द्वितीय अपील क्र. | माहितीचा विषय |
|---|---|---|
| १२ | २३०५/२०२४ | तहसिल कार्यालयाचे लॉगबुकबाबत. |
| १३ | ५९८३/२०२४ | अनाधिकृत गौण खनिज वाहतुक गुन्हा करताना पकडण्यात आलेल्या वाहने, ट्रॅक्टर, टिप्पर, अन्य वाहनाबाबत. |
| १४ | ५९८४/२०२४ | अतिवृष्टी अनुदानबाबत. |
| १५ | ५९८५/२०२४ | तहसिलदार, तहसिल कार्यालय, जाफ्राबाद यांच्या दालनातील सीसीटीव्ही फुटेजबाबत. |
| १६ | ८७४४/२०२४ | वाळु डेपोवरील सिसिटीव्ही फुटेजबाबत. |
| ४२ | ०९५३/२०२४ | अवैध वाळू उत्खनन मोजणी संदर्भात दि.०२.०८.२०२३ रोजी दाखल केलेल्या तक्रारीवरील अहवालबाबत. |
| ४८ | ५९८७/२०२४ | पुर्णा धामना केळणा नदीतील अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतुक प्रकरणी चौकशी करून निकाली काढण्यात आलेल्या टिपणी, अभिप्रायबाबत. |
| ४९ | ५९८८/२०२४ | अनुदान वाटप प्रकरणी केलेल्या तक्रार अर्जावरील कार्यवाहीबाबत. |

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी कथन केले की, माहिती अर्जाच्या अनुषंगाने आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपर्यंत उपलब्ध करून दिलेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्याने ती उपलब्ध करून देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी कथन केले की, बोर्ड क्र.१६ मधील माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली सिसिटीव्ही फुटेजबाबतची माहिती अपिलार्थी यांना तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी दि.२०.०८.२०२४ रोजी उपलब्ध करून दिल्याचे अभिलेखावरून दिसुन येत आहे. सदर माहिती पेनड्राईव्हमध्ये मिळाल्याबाबत अपिलार्थी यांची पोच आहे. तसेच बोर्ड क्र.४२ मधील माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि.०९.११.२०२३ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करून दिलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरून, बोर्ड क्र.१२ मधील माहिती अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीमध्ये आयोगास कोणतेही व्यापक जनहीत दिसुन येत नाही. त्यामुळे सदर माहिती अपिलार्थी यांना देय होत नाही. तसेच बोर्ड क्र.४२ व १६ मधील माहिती अर्जाच्या अनुषंगाने संबंधित जन माहिती अधिकारी यांनी दि.०९.११.२०२३ व २०.०८.२०२४ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस माहिती उपलब्ध करून दिल्याचे दिसुन येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या वर नमुद जोडपत्र अ नुसार **(बोर्ड क्र.१२,१६ व ४२ वगळता)** आवश्यक असलेली व कार्यालयाकडे उपलब्ध असलेली आणि अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत, अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७(६) नुसार नोंदणीकृत टपालाद्वारे विनामुल्य उपलब्ध करून द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करून देता येत नसल्यास तसे जन माहिती अधिकारी यांनी वस्तुस्थितीसह अपिलार्थी यांना स्पष्टपणे कळवावे.

२. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात विहित मुदतीत कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच **दि.१५.०९.२०२५ रोजी** व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी या कालावधीमध्ये खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

४. जिल्हाधिकारी, जालना यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी कलम १९ (६) चा भंग दिसून येत आहे. म्हणून त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.केंमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

५. उपरोक्त निर्देशानुसार द्वितीय अपीले निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र. 6917 दि. 26/06/2025

प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,
जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना

**राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले द्वितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर -४३१००१

श्री.शिवनारायण फकिरबा खंबाट, : अपिलार्थी
रा.पिंपळखुटा ता.जाफ्राबाद जि.जालना

विरुध्द

| बोर्ड क्र. | द्वितीय अपील क्र. | जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचा तपशिल | |
|---|---|---|---|
| १७ ते २६, २८ ते ३२ | ६३४, ६३६, ६३९, ६४०/२०२४, ५२७३, ५२७४/२०२४ ७२३६ ते ७२३९/२०२४ | जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, जाफ्राबाद जि.जालना<br><br>प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार, तहसिल कार्यालय, जाफ्राबाद जि.जालना | उत्तरवादी क्र.१<br><br>उत्तरवादी क्र.२ |
| २७ | ७२४०/२०२४ | जन माहिती अधिकारी तथा मंडळ अधिकारी, वरूड बा., ता.जाफ्राबाद जि. जालना<br>प्रथम अपिलीय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना | उत्तरवादी क्र.१<br><br>उत्तरवादी क्र.२ |

(सुनावणी दिनांक १७.०६.२०२५)

**निर्णय**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपिल दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. आज रोजी सुनावणी करीता अपिलार्थी, जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रावरून, अपिलार्थी यांनी एकुण १६ माहिती अर्जाद्वारे खालीलप्रमाणे माहिती मागितल्याचे दिसुन येत आहे.

| बोर्ड क्र. | द्वितीय अपील क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहितीचा विषय |
|---|---|---|---|
| १७ | २३०५/२०२४ | २०.१०.२०१३ | मुख्यालयी राहणा-या तलाठी, कर्मचारी यांची माहिती. |
| १८ | ५९८३/२०२४ | २३.१०.२०२३ | अपंग आरक्षण नियुक्त कर्मचा-यांबाबत |
| १९ | ०६३९/२०२४ | २३.१०.२०२३ | स्वातंत्र सैनिक प्रमाणपत्राबाबत |
| २० | ६४०/२०२४ | २३.१०.२०२३ | परवानाधारक राशन दुकान संदर्भात. |

| | | | |
|---|---|---|---|
| २१ | ५२७३/२०२४ | २९.०१.२०२४ | शेतक-याच्या दस्तखालील बोजाबाबत. |
| २२ | ५२७४/२०२४ | २९.०१.२०२४ | माहिती अधिकार नमुना पत्र अ, ब च्या प्रतीबाबत. |
| २३ | ७२३६/२०२४ | २६.०३.२०२४ | मौजे पिंपळखुटा येथील गट नं.७८ मध्ये फेरफार क्र.१३१२ बाबत. |
| २४ | ७२३७/२०२४ | २६.०३.२०२४ | मौजे पिंपळखुटा येथील गट नं.७८ मध्ये फेरफार क्र.१३०९ बाबत. |
| २५ | ७२३८/२०२४ | २८.०३.२०२४ | संजय गांधी अपंग निवृत्ती वेतन प्रस्तावबाबत. |
| २६ | ७२३९/२०२४ | ०५.०४.२०२४ | तलाठी सज्जा मेरखेडा व कोतवाल यांनी लावलेल्या नोटीसचे आदेशपत्र व पंचनाम्याबाबत. |
| २७ | ७२४०/२०२४ | २८.०३.२०२४ | दिनांक ०१ जाने.ते मार्च २०२४ पर्यंतचे हक्कसोड व वाटणीपत्रबाबत. |
| २८ | ७२४१/२०२४ | १६.०४.२०२४ | दिनांक ०१ डिसें.२०२३ ते मार्च २०२४ पर्यंतचे हक्कसोड व वाटणीपत्रबाबत. |
| २९ | ७२४२/२०२४ | १६.०४.२०२४ | सज्जा मेरखेडा अंतर्गत झालेला दुष्काळ-अतिवृष्टी अनुदानबाबत. |
| ३० | ९५३१/२०२४ | ०३.०७.२०२४ | तलाठी श्री.भालके जि.डब्ल्यु यांच्या मुळ नियुक्तीपत्राची प्रतबाबत. |
| ३१ | १०९०२/२०२४ | २६.०८.२०२४ | मौजे पिंपळखुटा येथील गट नं.७८ मध्ये फेरफार क्र.१३०९ व १३१२ बाबत. |
| ३२ | १०९०४/२०२४ | २६.०८.२०२४ | फेरफार क्र.१३१२ बाबत. |

२. आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तीवादात अवगत केले की, माहिती अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपर्यंत उपलब्ध करून दिलेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्याने ती उपलब्ध करून देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

३. आज रोजी सुनावणीच्या वेळी उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांना त्रास देण्याच्या उद्देशाने माहितीची मागणी केलेली आहे. अपिलार्थी हे माहिती अधिकारात सतत माहितीचे अर्ज देऊन प्रशासनावर दबाव करण्याच्या उद्देशाने माहितीची मागणी करतात. अपिलार्थी हे कार्यालयाकडे वारंवार व शब्द रचना बदलुन माहिती अर्ज करतात. अशा अर्जावर कार्यवाही करताना प्रशासनाचा बहुमुल्य वेळ खर्ची पडत असुन जनतेस गुणवत्तापुर्ण सेवा देण्यास अडचण येत आहे. अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जाद्वारे मागणी केलेली बहुतांश माहिती विस्तृत स्वरूपाची असल्याने अर्जदारास सदर माहिती संकलीत करून द्यावयाची झाल्यास त्याचा विपरीत परिणाम दैनंदिन शासकीय कामकाजावर होऊन गरजु व्यक्तीस नैसर्गीक न्याय देता येणे शक्य होत नाही. तसेच शासकीय योजनांची अंमलबजावणी करणे शक्य होत नाही. त्यामुळे अपिलार्थी यांची विचाराधीन द्वितीय अपीले निकाली काढण्याची विनंती करण्यात येत आहे.

४. प्रस्तुत प्रकरणात आयोगासमक्ष झालेला युक्तीवाद व उपलब्ध कागदपत्रावरून, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन केले असता, विविध विषयाबाबत जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीची मागणी केलेली आहे. अशा परिस्थितीत जन माहिती अधिकारी यांना सर्व अर्जांना ३० दिवसाच्या आत मुदतीत प्रतिसाद देताना त्याचा शासकीय कामकाजावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक १०६३८/२०२४
बोर्ड क्र. ३३

अॅड.अमोल एम.साळोक, — अपिलार्थी
प्लॉट नं.८, फ्लॅट नं.२, बालाजी अपार्टमेंट,
ए-सेक्टर, एन-१, सिडको, छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, जाफ्राबाद जि.जालना

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
तहसिलदार, तहसिल कार्यालय, जाफ्राबाद जि.जालना

**(सुनावणी दिनांक १७.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपिल दाखल केले आहेत. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| ३३ | दि.०३.०८.२०२४ | आदेश प्रकरण क्र.आरओआर/ आरईव्ही/३६५/२०१९ निकाल दि.३०.१०.२०१९ नुसार मौजे माहोरा ता.जाफ्राबाद येथील गट क्र.२६० मधील महामार्ग क्र.२२६ मध्ये संबंधित खातेदारांच्या गेलेल्या क्षेत्राच्या नोंदी घेऊन, अभिलेख अद्ययावत करणेबाबत. |

आज रोजी सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी कथन केले की, अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि.१६.०८.२०२४ रोजीच्या पत्राद्वारे मागणी केलेल्या माहितीची एकुण पृष्ठे २०६ असुन सदर माहिती करीता नियमाप्रमाणे शुल्क रू.४१२/- शासन खाती भरणा करून माहिती प्राप्त करून घेणेबाबत कळविण्यात आलेले आहे. अपिलार्थी यांच्या प्रथम अपीलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन दि.०५.०३.२०२५ रोजी निर्णय पारीत केलेला आहे. सदर प्रथम अपील आदेशानुसार अपिलार्थी यांना विनामुल्य नोंदणीकृत टपालाद्वारे माहिती उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात सुनावणी दरम्यान झालेला युक्तीवाद व उपलब्ध कागदपत्रांवरून, अपिलार्थी यांच्या

माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दि.१६.०८.२०२४ रोजीच्या पत्राद्वारे माहितीच्या शुल्काबाबत कळविल्याचे दिसुन येत आहे.. अपिलार्थी यांच्या दाखल प्रथम अपीलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन दि.०५.०३.२०२५ रोजी, अपिलार्थी यांनी मागणी केलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थी यांना ३० दिवसात उपलब्ध करून देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित केल्याचे दिसुन येत आहे. सदर प्रथम अपील आदेशानुसार जन माहिती अधिकारी यांनी दि.१२.०५.२०२५ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थी यांना एकुण २०६ पृष्ठांची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे उपलब्ध करून दिल्याचे दिसुन येत आहे. उपरोक्त सर्व बाबी विचारात घेता, विचाराधिन द्वितीय निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 6901 दिनांक : 26/06/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक - १०००३/२०२४
बोर्ड क्र. ३४

अॅड.शरद रंगनाथ वझरकर, — अपिलार्थी
रा.निलमनगर, रेल्वे स्टेशन रोड, जालना.

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा तलाठी, — : उत्तरवादी क्र.१
मौजे भारज बुद्रक, ता.जाफ्राबाद जि.जालना

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार, — : उत्तरवादी क्र.२
तहसिल कार्यालय, जाफ्राबाद जि.जालना

### (सुनावणी दिनांक १७.०६.२०२५)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दि.१२.०८.२०२४ रोजीच्या माहिती अर्जाद्वारे मौजे भारज बु.येथील गट क्र.१०२ संदर्भात मंजुर केलेला फेर फार क्र.२८६८ संचिकेतील कागदपत्राबाबत माहिती मागितलेली आहे.

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी कथन केले की, जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जाच्या अनुषंगाने आवश्यक असलेली माहिती उपलब्ध करून दिलेली नाही. सदर माहिती उपलब्ध करून देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, सुनावणी दरम्यान झालेला युक्तीवाद व आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास विहित मुदतीत प्रतिसाद दिला असल्याचे दिसून येत नाही. त्यानुषंगाने त्यांच्याकडुन कलम ७(१) चा भंग झाल्याचे दिसुन येत आहे. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन दि.०५.१२.२०२४ रोजी निर्णय पारीत केलेला आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

### आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा तलाठी, भारज बुद्रक, ता.जाफ्राबाद जि.जालना यांनी अपिलार्थी यांच्या वर नमुद जोडपत्र अ नुसार आवश्यक असलेली व कार्यालयाकडे उपलब्ध असलेली आणि अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत, अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७(६) नुसार नोंदणीकृत टपालाद्वारे विनामुल्य उपलब्ध करून द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करून देता येत नसल्यास तसे जन माहिती अधिकारी यांनी वस्तुस्थितीसह अपिलार्थी यांना स्पष्टपणे कळवावे.

२. प्रथम अपिलीय अधिकारी यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरीता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार, तहसिल कार्यालय, जाफ्राबाद जि.जालना यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात विहित मुदतीत कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच **दि.१५.०९.२०२५ रोजी** व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

४. उपरोक्त निर्देशानुसार द्वितीय अपीले निकाली काढण्यात येत आहे.

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

---

जावक क्र. 7393 दि. 02/07/2025

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १०६२/२०२४ व १५८८/२०२४**
**बोर्ड क्र. ३५ ते ३७ (एकुण २ अपीले)**

श्री.सय्यद मोबीन उद्दीन अलाउद्दीन, — अपिलार्थी
रा.घर नंबर ०१.१२.७१, जुनाबाजार, छत्रपती संभाजीनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, जाफ्राबाद जि.जालना

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
तहसिलदार, तहसिल कार्यालय, जाफ्राबाद जि.जालना

**(सुनावणी दिनांक १७.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपिल दाखल केले आहेत. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| ३५ | दि.३१.१०.२०२३ | सोबत दि.२५.०८.२०२२, २९.०८.२०२२,१२.१०.२०२२ रोजीचे पत्र तसेच तहसिलदार यांचे पत्र जा.क्र.७५७६ व इतर कागदपत्रांचे सत्यप्रतीबाबत. |
| ३७ | दि.१३.१२.२०२३ | प्रकरण क्र.१९८०/INC/WS/३०२/CR/७, दि.३१.१०.१९८९ या प्रकरणातील सर्व कागदपत्रांच्या प्रती. |

आज रोजी सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी कथन केले की, अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने आवश्यक असलेली माहिती उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. अपिलार्थी यांच्या प्रथम अपीलावर प्रथम अपिलीय अधिकारी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केलेला आहे.

अपिलार्थी यांनी कथन केले की, माहिती अर्जाच्या अनुषंगाने आवश्यक असलेली कोणतीही माहिती आजपर्यंत जन माहिती अधिकारी यांचेकडुन मिळालेली नाही. सदर माहिती उपलब्ध करून देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात सुनावणी दरम्यान झालेला युक्तीवाद व उपलब्ध कागदपत्रांवरून, बोर्ड क्र.३५ मधील

माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दि.०२.११.२०२३ रोजीच्या पत्राद्वारे माहिती उपलब्ध करून दिल्याचे दिसुन येत आहे. तथापि विचाराधिन दोन्ही माहिती अर्जानुसार आवश्यक असलेली माहिती मिळाली नसल्याबाबत आज रोजी अपिलार्थी यांनी आयोगास अवगत केलेले आहे. बोर्ड क्र.३७ मधील माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना कोणताही प्रतिसाद दिल्याचे दिसुन येत नाही. त्यामुळे त्यांच्याकडुन कलम ७(१)चा भंग झाल्याचे दिसुन येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, जाफ्राबाद जि.जालना यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, जाफ्राबाद जि.जालना यांनी **(बोर्ड क्र.३७ मधील)** अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात विहित मुदतीत कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच दि.१५.०९.२०२५रोजी व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी या कालावधीमध्ये खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. तहसिलदार, तहसिल कार्यालय, जाफ्राबाद जि.जालना यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरीता प्राधिकृत करण्यात येत आहे.

४. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

जा.क्र. 6926 दिनांक : 26/06/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १५८८/२०२४**
**बोर्ड क्र. ३६**

श्री.सय्यद मोबीन उद्दीन अलाउद्दीन, — अपिलार्थी
रा.घर नंबर ०१.१२.७१, जुनाबाजार, छत्रपती संभाजीनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, जाफ्राबाद जि.जालना

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
तहसिलदार, तहसिल कार्यालय, जाफ्राबाद जि.जालना

## (सुनावणी दिनांक १७.०६.२०२५)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपिल दाखल केले आहेत. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| ३६ | दि.२०.१२.२०२३ | कार्यालयाच्या सन १९६७ च्या फेर फारबाबत एकुण २ मुद्दयांची माहिती. |

आज रोजी सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी कथन केले की, अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने आवश्यक असलेली माहिती उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. अपिलार्थी यांच्या प्रथम अपीलावर प्रथम अपिलीय अधिकारी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केलेला आहे.

अपिलार्थी यांनी कथन केले की, जन माहिती अधिकारी यांनी अपुर्ण माहिती उपलब्ध करून दिलेली आहे. सदर माहिती उपलब्ध करून देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात सुनावणी दरम्यान झालेला युक्तीवाद व उपलब्ध कागदपत्रांवरून, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दि.२८.१२.२०२३ रोजीच्या पत्राद्वारे प्रतिसाद दिल्याचे दिसुन येत आहे. तथापि सदर माहिती अपुर्ण असल्याबाबत अपिलार्थी यांनी सुनावणी दरम्यान आयोगास अवगत केलेले आहे. हि बाब विचारात घेता, अपिलार्थी यांनी सदर माहितीकरीता कलम २(त्र) नुसार माहितीचे अवलोकन घेणे संयुक्तीक ठरेल, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, जाफ्राबाद जि.जालना यांनी, आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत एक दिवस निश्चित करून अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, अवलोकनास्तव उपलब्ध करून द्यावी. अवलोकनानंतर आदेशात नमुद माहिती अर्जाच्या अनुषंगाने अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली ५० पृष्ठांची माहिती अपिलार्थीस विनामुल्य उपलब्ध करून द्यावी व त्यापेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास सदर माहिती अपिलार्थी यांना नियमाप्रमाणे सशुल्क उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे वस्तुस्थितीसह अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. तहसिलदार, तहसिल कार्यालय, जाफ्राबाद जि.जालना यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरीता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 6924 दिनांक : 26/06/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक - १९९४/२०२४ व १९९६/२०२४**
**बोर्ड क्र. ३८ व ३९**

श्री. राजेंद्रकुमार मिसनलाल जयस्वाल, अपिलार्थी
रा.छत्रपती शिवाजी महाराज चौक, बदनापुर,
ता.बदनापुर जि.जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
तलाठी, तलाठी सजा बदनापुर जि.जालना

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय,
बदनापुर जि.जालना

**(सुनावणी दिनांक १७.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| ३९ | दि.२८.११.२०२३ | बदनापुर सजातील बदनापुर, रामखेडा, पाडळी या शिवारातील तलाठी कार्यालयामार्फत खरेदी विक्री झालेल्या / केलेल्या फेरफार घेण्यात आलेल्या गटानुसार नोंदवहीतील नोंदीची माहिती. सन २०१७ ते माहिती मिळेपर्यंत. |
| ३८ | दि.२८.११.२०२३ | बदनापुर सजातील बदनापुर, रामखेडा, पाडळी या शिवारातील तलाठी कार्यालयामार्फत खरेदी विक्री झालेल्या / केलेल्या फेरफारची यादी व इतरबाबत. सन २०१७ ते माहिती मिळेपर्यंत. |

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी असे कथन केले की, माहिती अर्जाच्या अनुषंगाने आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपावेतो उपलब्ध करून दिलेली नाही. सदर माहिती उपलब्ध करून देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी असे अवगत केले की, अपिलार्थी यांना माहिती अर्जान्वये दि.०१.०२.२०२४ रोजीच्या पत्राद्वारे मौजे रामखेडा व बदनापुर वारस फेरफार यादी उपलब्ध करून दिलेली आहे व फेरफार नक्कल करीता शुल्क रू.२९२५/- शासनखाती भरणा करून नक्कला घेऊन जाणेबाबत अपिलार्थी यांना कळविण्यात आलेले आहे. तसेच वारस फेरफार न झालेल्याची यादी या कार्यालयाच्या स्तरावर उपलब्ध नसल्याबाबत ही अपिलार्थी यांना कळविण्यात आलेले आहे. माहिती अर्जातील नमुद मौजे पाडळी हे गाव बदनापुर सजा अंतर्गत येत नाही, तसेच मागणी केलेली माहिती ही शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असल्याबाबत अपिलार्थी यांना कळविण्यात आलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, सुनावणी दरम्यान झालेला युक्तीवाद व आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाद्वारे मागणी केलेली फेर फार यादी अपिलार्थीस उपलब्ध करून असल्याचे, तसेच फेरफार नक्कल करीता शुल्क रू.२९२५/- शासनखाती भरणा करून नक्कला प्राप्त करून घेणेबाबत अपिलार्थी यांना दि.०१.०२.२०२४ रोजीच्या पत्राद्वारे कळविलेले दिसुन येत आहे. तसेच सदर माहिती हि शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असल्याबाबत आज रोजी सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केलेले आहे. हि बाब विचारात घेता, अपिलार्थी यांनी त्यांना हवी असलेली उर्वरीत माहिती शासनाच्या संकेतस्थळावरून प्राप्त करून घ्यावी. या निर्देशासह विचाराधिन द्वितीय अपील निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.---6925--- दिनांक :-26/06/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक - १६८५/२०२४**
**बोर्ड क्र. ४०**

श्री.गणेश जगन्नाथ बोरुडे,
रा.हिवराळा ता.बदलापुर जि.जालना — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा तलाठी,
तलाठी सजा हिवरा (राळा), ता.बदनापुर जि.जालना — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
तहसिलदार, तहसिल कार्यालय, बदनापुर जि.जालना — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक १७.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दि.१८.१२.२०२३ रोजीच्या माहिती अर्जाद्वारे मौजे हिवरा (राळा) येथील जमिनीचे कागदपत्र मिळणेबाबत एकुण ४ मुद्दयांची माहिती मागितलेली आहे.

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी कथन केले की, माहिती अर्जाच्या अनुषं गाने आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपावेतो उपलब्ध करून दिलेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्याने ती उपलब्ध करून देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाद्वारे एकाच अर्जात वेगवेगळया प्राधिकरणाची माहितीची मागणी केलेली आहे. त्यानुसार कार्यालयाच्या स्थरावरील नक्कला अपिलार्थी यांना दि.१८.१२.२०२३ रोजी उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत. करीता विचाराधिन द्वितीय अपील निकाली काढण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, सुनावणी दरम्यान झालेला युक्तीवाद व आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांनी एकाच माहिती अर्जात वेगवेगळया प्राधिकरणाच्या माहितीची मागणी केलेली दिसुन येत आहे. त्यानुसार जन माहिती अधिकारी यांनी दि.१८.१२.२०२३ रोजी अपिलार्थी यांना कार्यालयीन स्तरावरील माहिती उपलब्ध करून दिल्याचे दिसुन येत आहे. उर्वरित माहितीकरीता अपिलार्थी यांनी संबंधित प्राधिकरणाकडे स्वतंत्र अर्ज करून माहिती प्राप्त करून घ्यावी, या निर्देशासह आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.---6908--- दिनांक :--26/06/2025

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक - २६९/२०२४
बोर्ड क्र. ४१

श्री.वामन एकनाथ उगले, — अपिलार्थी
प्रगती चाळ नं.२, घर नं.८६८६, सावंत पार्कच्या पाठीमागे,
खदान जवळ, महालक्ष्मी नगर, अंबरनाथ पू., जि.ठाणे.

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार(साप्रवि), : उत्तरवादी क्र.१
जिल्हाधिकारी कार्यालय, जालना

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार(साप्रवि), : उत्तरवादी क्र.२
जिल्हाधिकारी कार्यालय, जालना

(सुनावणी दिनांक १७.०६.२०२५)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दि.०९.०९.२०२३ रोजीच्या माहिती अर्जाद्वारे मंठा येथील तहसिलदार श्रीमती चित्राक यांच्या रूजु रिपोर्ट, पदग्रहण केल्यापासुनची चार्जशिट इत्यादीबाबत माहिती मागितलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती ही त्रयस्थ पक्षाशी संबंधित असल्याचे दिसुन येत आहे. अशी माहिती प्रकट केल्याने त्रयस्थाच्या खाजगी बाबीमध्ये आंगतुक हस्तक्षेप होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे अशी माहिती अधिनियमातील कलम ८(१)(त्र)नुसार अपिलार्थीस देय होत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 7382 दिनांक : 02/07/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक - १२२०/२०२४
बोर्ड क्र. ४३

श्री.संतोष गंगाधर नातेवार, — अपिलार्थी
रा.तिरूपती नगर धनेगांव, नांदेड.

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी, — : उत्तरवादी क्र.१
जिल्हाधिकारी कार्यालय, जालना

२ प्रथम अपिलीय अधिकारी , — : उत्तरवादी क्र.२
जिल्हाधिकारी कार्यालय, जालना

**(सुनावणी दिनांक १७.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दि.१२.०८.२०२४ रोजीच्या माहिती अर्जाद्वारे मौजे लालवाडी ता.अंबड जि.जालना या संपुर्ण गावाची सन १९९५ ते २००० पर्यंतची ग्रामपंचायत यादी मिळणेबाबत माहिती मागितलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, सुनावणी दरम्यान झालेला युक्तीवाद व आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन, प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांनी माहिती अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती विस्तृत व मोठ्या कालावधीची आहे. अशी माहिती एकत्रीत करण्याकरीता सार्वजनीक प्राधिकरणाकडील मणुष्यबळ व साधनसामग्री मोठया प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब कलम ७(९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भुमिका व उद्दीष्ट सफल होत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र. 7383 दि. 02/07/2025

| | |
|---|---|
| | राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य खंडपीठ, छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर<br>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील |

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| बोर्ड क्रमांक : ४४ ते ४६ | द्वितीय अपील क्रमांक :- २३२८/२०२४, २३२९/२०२४ व २३३५/२०२४ |
|---|---|

| अक्र. | तपशिल | |
|---|---|---|
| १ | श्री. एकनाथ रामधन राठोड, रा. बेगमपुरा, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय छत्रपती संभाजीनगर | अपिलार्थी |
| | विरुध्द | |
| १ | जन माहिती अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना | उत्तरवादी क्र. १ |
| २ | प्रथम अपिलीय अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना | उत्तरवादी क्र. २ |

(सुनावणी दिनांक १७.०६.२०२५)

अपिलार्थी यांनी दिनांक २२.१२.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग,खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर द्वितीय अपीलाची सुनावणी आयोगासमोर घेण्यात येणार असल्याबद्यल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीच्या सुनावणीसाठीचा बोर्ड (वादसूची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. त्यानुसार आज रोजी सदर प्रकरणात सुनावणी घेण्यात येत आहे. आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहे. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे माहिती अर्जाद्वारे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

| बोर्ड क्र. | द्वितीय अपील क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहितीचा विषय |
|---|---|---|---|
| ४४ | २३२८/२०२४ | ०४.१२.२०२३ | राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ छ.संभाजीनगर यांचे द्वितीय अपील क्र.७६९ व ७७१/२०२३ सुनावणी दिनांक २३.०८.२०२३ नुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांचेविरूद्ध शासन परिपत्रक दि.३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार केलेल्या कार्यवाहीचा दैनंदिन प्रगती अहवालबाबत. |
| ४५ | २३२९/२०२४ | ०४.१२.२०२३ | राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ छ.संभाजीनगर यांचे द्वितीय अपील क्र.४०१० सुनावणी दिनांक २६.०८.२०२३ नुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांचेविरूद्ध शासन परिपत्रक दि.३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार केलेल्या कार्यवाहीचा दैनंदिन प्रगती अहवालबाबत. |
| ४६ | २३३५/२०२४ | ०४.१२.२०२३ | राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ छ.संभाजीनगर यांचे द्वितीय अपील क्र.७६९ व ७७१/२०२३ सुनावणी दिनांक २३.०८.२०२३ नुसार जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचेविरूद्ध शासन परिपत्रक दि.०१.१२.२० मधील तरतुदीनुसार केलेल्या कार्यवाहीचा दैनंदिन प्रगती अहवालबाबत. |

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी कथन केले की, माहिती अर्जाच्या अनुषंगाने आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करून दिलेली नाही. सदर माहिती उपलब्ध करून देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणाच्या अनुषंगाने आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरून आयोगाच्या अशा निदर्शनास आलेले आहे की, अपिलार्थी हे शासकीय कर्मचारी आहेत. तसेच अपिलार्थी हे विविध कार्यालयात वारंवार माहिती अधिकारात माहितीची मागणी करीत आहेत. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ३ नुसार प्रत्येक नागरिकास माहितीचा अधिकार प्राप्त झालेला आहे. असा अधिकार शासकीय अधिकारी / कर्मचारी यांना देखील प्राप्त झालेला आहे. मात्र, अशा अधिकाराचा वापर शासकीय अधिकारी व कर्मचारी यांनी पूरेशा गांभिर्याने करणे आवश्यक आहे, असे आयोगाचे मत आहे. मात्र अपिलार्थी हे अमर्यादीत स्वरूपात माहिती अधिकाराचा वापर करीत आहे.

प्रस्तुत प्रकरणात, माहिती अधिकारांतर्गत अभिलेखात उपलब्ध असलेल्या विशिष्ठ कागदपत्रांची मागणी करणे अपेक्षीत आहे किंवा अशा स्वरूपातील माहितीच्या मागणीकरीता माहिती अधिकाराचा वापर करणे योग्य वाटते. मात्र, माहिती अधिकारातंर्गत सादर केलेल्या माहिती, प्रथम अपील, द्वितीय अपील व द्वितीय अपीलांवरील आयोगाने दिलेल्या निर्णयानुसार केलेल्या कार्यवाहीची माहिती ज्ञात करून घेण्याकरीता माहिती अधिकाराचा वापर करणे योग्य वाटत नाही.

या प्रकरणाच्या अनुषंगाने सर्व संबंधितांचे लक्ष द्वितीय अपील क्र.८१५०/२०२३ ते ८१५८/२०२३ मध्ये दिनांक २३.०१.२०२५ रोजी आयोगाने पारीत केलेल्या आदेशाकडे वेधण्यात येत आहे. या निर्णयामध्ये आयोगाने अपिलार्थी हे कायद्याचा दुरूपयोग करत असल्याचा निष्कर्ष काढुन अपिलार्थी यांची सर्व द्वितीय अपीले निकाली काढलेली आहेत.

प्रस्तुत प्रकरणाच्या अनुषंगाने आयोगाकडील उपरोक्त निर्णय विचारात घेता, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

<u>आदेश</u>

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र. द्वितीय अपील क्र. 6937 / दि. 26/06/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक २६२६/२०२४
बोर्ड क्र. ४७

श्री.सय्यद मोबीन उद्दीन अलाउद्दीन, — अपिलार्थी
रा.घर नंबर ०१.१२.७१, जुनाबाजार, छत्रपती संभाजीनगर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकुन(भुसुधार विभाग), : उत्तरवादी क्र.१
जिल्हाधिकारी कार्यालय, जालना

प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हाधिकारी, : उत्तरवादी क्र.२
जिल्हाधिकारी कार्यालय, जालना

**(सुनावणी दिनांक १७.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपिल दाखल केले आहेत. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| ४७ | दि.२४.०१.२०२४ | केस नं.८९/L/LRC/TN/CR-४२ यांचे आदेश दि.०९.०२.१९९० नामे सय्यद अलाउद्दीन विरूद्ध गोविंद पि.हनुमन्ता व इतर या संचिकेचे कागदपत्र मिळणेबाबत. |

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी कथन केले की, माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपर्यंत उपलब्ध करून दिलेली नाही. सदर माहिती उपलब्ध करून देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात सुनावणी दरम्यान झालेला युक्तीवाद व उपलब्ध कागदपत्रांवरून, अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी उपलब्ध करून दिल्याचे दिसुन येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकुन(भुसुधार विभाग), जिल्हाधिकारी कार्यालय, जालना यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद माहितीचा कार्यालयीन अभिलेखात कसोशीने

शोध घेऊन कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. नायब तहसिलदार(सा.प्र.), जिल्हाधिकारी कार्यालय, जालना यांनी वर नमुद केल्याप्रमाणे शोध घेऊनही मागणी केलेली माहिती अभिलेखात उपलब्ध न झाल्यास सदर माहिती संदर्भातील अभिलेख जतन करून ठेवावयाची जबाबदारी ज्या अधिकारी / कर्मचारी यांच्यावर होती त्या संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेविरूद्ध (अभिलेखाचा जतन कालावधी विचारात घेऊन) महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम, २००५ नुसार यथोचित कार्यवाही प्रस्तावित करावी.

३. तहसिलदार(सा.प्र.), जिल्हाधिकारी कार्यालय, जालना यांनी उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरीता प्राधिकृत करण्यात येत आहे.

४. उपरोक्तनुसार द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.--6923-- दिनांक :--26/06/2025--

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक - ४७४५/२०२४
बोर्ड क्र. ५०

श्री.शामराव सुंदरराव खरात, — अपिलार्थी
मु.पो.पाथरवाला बु., ता.अंबड जि.जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार(संगयो), तहसिल कार्यालय, अंबड जि.जालना : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार, तहसिल कार्यालय, अंबड जि.जालना : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक १७.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये दि.२६.१२.२०२३ रोजीच्या माहिती अर्जाद्वारे संजय गांधी योजनेअंतर्गत निवृत्तीवेतन व इतर योजनेअंतर्गत मयत झालेल्या लाभधारकांबाबत सन २०२१ ते २०२३ पर्यंतची माहिती मागितलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती ही विस्तृत व मोघम स्वरुपाची असल्याचे दिसुन येत आहे. अशी माहिती एकत्रीत करण्याकरीता सार्वजनीक प्राधिकरणाकडील मणुष्यबळ व साधनसामग्री मोठया प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब कलम ७(९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारा मागील भुमिका व उद्दीष्ट सफल होत नाही. तसेच मागणी केलेल्या माहितीमध्ये आयोगास कोणतेही व्यापक जनहित दिसुन येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.-6922 दिनांक :-26/06/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक - ४७५०/२०२४
बोर्ड क्र. ५१

श्री.शामराव सुंदरराव खरात, अपिलार्थी
मु.पो.पाथरवाला बु., ता.अंबड जि.जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक १७.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

प्रस्तुत प्रकरणात, आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करताना त्यासोबत सादर केलेल्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता, सदर माहिती अर्ज वाचनीय नसल्याचे निदर्शनास येत आहे. त्यामुळे अपिलार्थी यांना नेमकी कोणती माहिती हवी आहे याचा बोध होत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6921 दिनांक : 26/06/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक - ७९३५/२०२४**
**बोर्ड क्र. ५२**

श्री.हरिश्चंद्र केदारी खांडेकर, मु.पो.टेंभुर्णी, ता.जाफ्राबाद जि.जालना. — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी अव्वल कारकुन(महसुल), जिल्हाधिकारी कार्यालय, जालना : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार(महसुल), जिल्हाधिकारी कार्यालय, जालना : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक १७.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दि.१२.०७.२०२४ रोजीच्या माहिती अर्जाद्वार स्वातंत्र्य सैनिक प्रमाणपत्राचा रद्द अहवाल व संपुर्ण संचिकेबाबत माहिती मागितलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, सुनावणी दरम्यान झालेला युक्तीवाद व आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांच्या दाखल प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.२३.०९.२०२४ रोजी सुनावणी घेऊन, अपिलार्थी यांना आवश्यक असलेली माहिती नि:शुल्क उपलब्ध करून देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. त्यानुसार दि.२३.०९.२०२४ रोजीच्या पत्राद्वारे एकुण १५२ पृष्ठांची माहिती अपिलार्थीस उपलब्ध करून दिल्याचे दिसुन येत आहे. सदर पत्रावर अपिलार्थी यांची पोच आहे. हि बाब विचारात घेता, विचाराधिन द्वितीय अपील निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(स्वाक्षरी)

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

जा.क्र. 7384 दिनांक : 02/07/2025

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक - १०४७८/२०२४
बोर्ड क्र. ५३

श्री.विकास कुमार बागडी, — अपिलार्थी
नाथ गल्ली सदर बाजार, जालना.

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
नायब तहसिलदार(निवडणुक),
जिल्हाधिकारी कार्यालय, जालना

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
उप जिल्हा निवडणुक अधिकारी, जालना

**(सुनावणी दिनांक १७.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दि.२५.०७.२०२४ रोजीच्या माहिती अर्जाद्वारे बोथरा सप्लायर्स यांनी सादर केलेल्या बीलबाबत एकुण ५ मुद्दयांद्वारे माहिती मागितलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, सुनावणी दरम्यान झालेला युक्तीवाद व आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दि.१२.०८.२०२४ रोजीच्या पत्रान्वये तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन पारीत केलेल्या प्रथम अपील आदेशानुसार दि.०७.०२.२०२५ रोजीच्या पत्राद्वारे माहिती उपलब्ध करून दिल्याचे दिसुन येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 7385 दिनांक : 02/07/2025

| | |
|---|---|
| | राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य खंडपीठ, छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर<br>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील |

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| बोर्ड क्रमांक : ५४ ते ५६ | द्वितीय अपील क्रमांक :- २३३०/२०२४ ते २३३२/२०२४ |
|---|---|

| अक्र. | तपशिल | |
|---|---|---|
| १ | श्री. एकनाथ रामधन राठोड, रा. बेगमपुरा, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय छत्रपती संभाजीनगर | अपिलार्थी |
| | विरुध्द | |
| १ | जन माहिती अधिकारी, तहसिल कार्यालय, जालना | उत्तरवादी क्र. १ |
| २ | प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार, तहसिल कार्यालय, जालना | उत्तरवादी क्र. २ |

(सुनावणी दिनांक १७.०६.२०२५)

अपिलार्थी यांनी दिनांक २२.१२.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग,खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर द्वितीय अपीलाची सुनावणी आयोगासमोर घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीच्या सुनावणीसाठीचा बोर्ड (वादसूची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. त्यानुसार आज रोजी सदर प्रकरणात सुनावणी घेण्यात येत आहे. आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे माहिती अर्जाद्वारे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

| बोर्ड क्र. | द्वितीय अपील क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहितीचा विषय |
|---|---|---|---|
| ५४ | २३३०/२०२४ | ०४.१२.२०२३ | राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ छ.संभाजीनगर यांचे द्वितीय अपील क्र.४०१०/२०२१ सुनावणी दिनांक २९.०८.२०२३ नुसार केलेल्या कार्यवाहीचा दैनंदिन प्रगती अहवाल |
| ५५ | २३३१/२०२४ | ०४.१२.२०२३ | राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ छ.संभाजीनगर यांचे द्वितीय अपील क्र.७६९ व ७७१/२०२१ सुनावणी दिनांक २३.०८.२०२३ नुसार केलेल्या कार्यवाहीचा दैनंदिन प्रगती अहवाल |
| ५६ | २३३२/२०२४ | ०४.१२.२०२३ | राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ छ.संभाजीनगर यांचे द्वितीय अपील क्र.४०१०/२०२१ सुनावणी दिनांक २३.०८.२०२३ नुसार केलेल्या कार्यवाहीचा दैनंदिन प्रगती अहवाल |

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी कथन केले की, माहिती अर्जाच्या अनुषंगाने आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करून दिलेली नाही. सदर माहिती उपलब्ध करून देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी कथन केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये मागितलेली माहिती आज रोजी सोबत आनलेली असुन ती आयोगाच्या निर्देशानुसार अपिलार्थी यांना आयोगासमक्ष उपलब्ध करून देण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, आज रोजी सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या निर्देशाप्रमाणे अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने आवश्यक असलेली माहिती आयोगासमक्ष उपलब्ध करून दिलेली आहे व ती अपिलार्थी यांनी स्विकारलेली आहे. हि बाब विचारात घेता, विचाराधिन द्वितीय अपील निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

प्र २।।६

( प्रकाश इंदलकर )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र. द्वितीय अपील क्र. 6936 / दि. 26/06/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ७८८६/२०२४**
**बोर्ड क्र. ५७**

श्री.सय्यद मोबीन उद्दीन अलाउद्दीन, — अपिलार्थी
रा.घर नंबर ०१.१२.७१, जुनाबाजार, छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
नायब तहसिलदार(पुरवठा), तहसिल कार्यालय, जालना

प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
तहसिलदार, तहसिल कार्यालय, जालना

**(सुनावणी दिनांक १७.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपिल दाखल केले आहेत. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| ५७ | दि.२८.०५.२०२४ | नामे मोहम्मद एजाज खॉ हकीम खॉ यांनी राशन कार्ड घेता वेळी अर्जासोबत जे जे पुरावे दाखल केलेले पुरावे व इतर ३ मुद्दयांबाबत. |

प्रस्तुत प्रकरणात सुनावणी दरम्यान झालेला युक्तीवाद व उपलब्ध कागदपत्रांवरून, अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी दि.३०.०५.२०२४ रोजीच्या पत्राद्वारे विहीत मुदतीत उपलब्ध करून दिल्याचे दिसुन येत आहे. हि बाब विचारात घेता, विचाराधिन द्वितीय अपील निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.- 6920 दिनांक :- 26/06/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक - २५०९/२०२४
बोर्ड क्र. ६२

श्री.वामन एकनाथ उगले, अपिलार्थी
प्रगती चाळ नं.२, घर नं.८६८६, सावंत पार्कच्या पाठीमागे,
खदान जवळ, महालक्ष्मी नगर, अंबरनाथ पू., जि.ठाणे.

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, : उत्तरवादी क्र.१
उपविभागीय अधिकारी कार्यालय, जालना

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, : उत्तरवादी क्र.२
उपविभागीय अधिकारी कार्यालय, जालना

(सुनावणी दिनांक १७.०६.२०२५)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दि.१५.०१.२०२४ रोजीच्या माहिती अर्जाद्वारे मौजे सेवली ता.जि.जालना येथील सन २०१५ पासुन आजपर्यंत बांधकाम परवानगीसाठी प्राप्त अर्जांची यादी इ.बाबत माहिती मागितलेली आहे.

आज रोजी सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी कथन केले की, अपिलार्थी यांना माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली माहिती दि.१०.०७.२०२४ रोजीच्या पत्राद्वारे उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, सुनावणी दरम्यान झालेला युक्तीवाद व आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी दि.१०.०७.२०२४ रोजीच्या पत्राद्वारे उपलब्ध करून दिल्याचे दिसुन येत आहे. हि बाब विचारात घेता, विचाराधिन द्वितीय अपील निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे .

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.- 7386 दिनांक :- 02/07/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक - ७५८१/२०२४**
**बोर्ड क्र. ६३**

श्री.अभिषेक बालाप्रसाद व्यास, बडी सडक, राम मंदीरजवळ, जालना. — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, उपविभागीय अधिकारी कार्यालय, जालना — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, उपविभागीय अधिकारी कार्यालय, जालना — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक १७.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दि.१७.०८.२०२३ रोजीच्या माहिती अर्जाद्वारे गोपाल रामचंद्र अंबेवाल यांचे विरोधात हद्दपारी आदेश व झालेली कार्यवाहीबाबत माहिती मागितलेली आहे.

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी कथन केले की, माहिती अर्जाच्या अनुषंगाने आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करून दिलेली नाही. सदर माहिती उपलब्ध करून देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, सुनावणी दरम्यान झालेला युक्तीवाद व आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांच्या दाखल प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन दि.२१.०६.२०२४ रोजी, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाद्वारे त्रयस्थ पक्षाची वैयक्तीक स्वरूपाची माहिती मागितलेली असल्याने सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय मुंबई, शासन परिपत्रक दि.१७ ऑक्टोबर, २०१४ अन्वये प्रथम अपील फेटाळलेले आहे. अपिलार्थी यांचा माहिती अर्ज व प्रथम अपीलय अधिकारी यांनी पारीत केलेले प्रथम अपील आदेश व अधिनियमातील तरतुदी याचा सारासार विचार करता, प्रथम अपीलीय अधिकारी यांनी पारीत केलेल्या प्रथम अपील आदेशात बदल करण्याची आयोगास आवश्यकता वाटत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपील फेटाळण्यात येत आहे.

(स्वाक्षरी) ५/२/२

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

जा.क्र. 7387 दिनांक : 02/07/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक - ९५८६/२०२४**
बोर्ड क्र. ६४

सौ.निलम मनोज पटवारी,
रा.घर क्र.१/०६/३२, जे.ई.एस.कॉलेज मार्ग,
खर्डेकर कॉम्प्लेक्स जवळ, जालना-४३१२०३. — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, उपविभागीय अधिकारी कार्यालय, जालना — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, उपविभागीय अधिकारी कार्यालय, जालना — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक १७.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दि.१५.०४.२०२४ रोजीच्या माहिती अर्जाद्वारे दि.०५.०६.२०२३ रोजी केलेल्या तक्रारीवरील कार्यवाहीबाबत माहिती मागितलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास विहित मुदतीत प्रतिसाद दिला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम १९ (६) चा भंग झालेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांना माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली माहिती अद्यापपावतो मिळाल्याचे दिसुन येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, उपविभागीय अधिकारी कार्यालय, जालना यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, उपविभागीय अधिकारी कार्यालय, जालना यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात विहित मुदतीत कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच **दि.१५.०९.२०२५ रोजी** व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. तहसिलदार, उपविभागीय अधिकारी कार्यालय, जालना यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करीता प्राधिकृत करण्यात येत आहे.

४. जिल्हाधिकारी, जालना यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी कलम १९ (६) चा भंग दिसून येत आहे. म्हणून त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.केंमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

५. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

प्रकाश

(प्रकाश इंदलेकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र. 7388 दि. 02/07/2025

प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,
जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक - ९८७६/२०२४**
**बोर्ड क्र. ६५**

श्री.सय्यद जाकेर सय्यद महमुद, — अपिलार्थी
रा.मियाँ साहेब दर्गा शरिफ काद्रबाद, जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, उपविभागीय अधिकारी कार्यालय, जालना — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, उपविभागीय अधिकारी कार्यालय, जालना — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक १७.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दि.२६.०८.२०२४ रोजीच्या माहिती अर्जाद्वारे सयद जाकेर सय्यद महेमुद विरूद्ध वखार महामंडळ प्रकरण २०२२/उपविअ/अकृषिक/कावी/ या प्रकरणाच्या निर्णयाची प्रत मिळणेबाबत माहिती मागितलेली आहे.

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी कथन केले की, माहिती अर्जाच्या अनुषंगाने आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपर्यंत उपलब्ध करून दिलेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्याने ती उपलब्ध करून देणेबाबत जनमाहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, सुनावणी दरम्यान झालेला युक्तीवाद व आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करून दिल्याचे दिसुन येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**<u>आदेश</u>**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, उपविभागीय अधिकारी कार्यालय, जालना यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या

आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. उपविभागीय अधिकारी, उपविभागीय अधिकारी कार्यालय, जालना यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरीता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.---7389--- दिनांक :--02/07/2025

**राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले द्वितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर -४३१००१

श्री.शामराव सुंदरराव खरात,
रा.पाथरवला बु., ता.अंबड जि.जालना : अपिलार्थी

विरुध्द

| बोर्ड क्र. | जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचा तपशिल | |
|---|---|---|
| ६६ ते ७७ | १. जन माहिती अधिकारी, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी कार्यालय, जालना<br>२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी कार्यालय, जालना | उत्तरवादी क्र.१<br>उत्तरवादी क्र.२ |

**(सुनावणी दिनांक १७.०६.२०२५)**

**निर्णय**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपिल दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. आज रोजी सुनावणी करीता अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रावरून, अपिलार्थी यांनी एकुण १२ माहिती अर्जाद्वारे खालीलप्रमाणे माहिती मागितल्याचे दिसुन येत आहे.

| बोर्ड क्र. | द्वितीय अपील क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहितीचा विषय |
|---|---|---|---|
| ६६ | १८३३/२०२४ | १५.०९.२०२३ | दि.०३.०३.२०२० व दि.२९.०२.२०२० रोजी दिलेल्या पत्रावरील चौकशी अहवाल. |
| ६७ | ४५५०/२०२४ | ०४.१२.२०२३ | जलयुक्त शिवार योजनेत झालेल्या चौकशी अहवालाबाबत. |
| ६८ | ४७४४/२०२४ | ०५.०१.२०२४ | जिल्हाधिकारी, जालना यांनी दि.०४.१२.२०२३ रोजी पाठविलेल्या १७ निवेदनावरील कार्यवाहीबाबत. |
| ६९ | ७५४४/२०२४ | २६.०२.२०२४ | तक्रारीवरील कार्यवाहीबाबत. |
| ७० | ७५४६/२०२४ | २६.०२.२०२४ | जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांना केलेल्या दंड व शास्तीबाबत. |

| | | | |
|---|---|---|---|
| ७१ | ७५४७/२०२४ | १२.०४.२०२४ | दि.२८.०७.२०२१ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांनी दिलेल्या निर्णयावरील कार्यवाहीबाबत. |
| ७२ | ८७८७/२०२४ | २६.०२.२०२४ | फौजदारी गुन्हयाबाबत. |
| ७३ | १०६२१/२०२४ | ०८.०७.२०२४ | विभागीय कृषी संचालक, औरंगाबाद यांच्या दि.२०.०९.२०२७ च्या परिपत्रकानुसार केलेल्या कार्यवाहीबाबत. |
| ७४ | १०६२२/२०२४ | ०८.०७.२०२४ | प्रलंबीत तक्रारीच्या चौकशी अहवालाबाबत. |
| ७५ | १०८५९/२०२४ | ०८.०७.२०२४ | फळबाग लागवड योजनेमध्ये अनिल लगामे यांचेविरूद्ध पाठवलेल्या शिस्तभंगाच्या कारवाईबाबत. |
| ७६ | १०८६०/२०२४ | ०८.०७.२०२४ | दि.२५.०८.२०२१ च्या तक्रारीची चौकशी अहवालाबाबत. |
| ७७ | १०८६२/२०२४ | ३१.०७.२०२४ | तक्रार निवारण समितीद्वारे सर्व तक्रारीवर केलेल्या दोषीवरील कारवाईबाबत. |

२. आज रोजी सुनावणीच्या वेळी उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी हे पूर्वग्रह दुषित होऊन कार्यालयाकडे मोठ्या प्रमाणावर शेकडोच्या संख्येने वारंवार माहिती अर्ज सादर करतात. अपिलार्थी हे सेवानिवृत्त शासकीय कर्मचारी आहेत. अपिलार्थी हे माहिती अधिकारात सतत माहितीचे अर्ज देऊन प्रशासनावर दबाव करण्याच्या उद्देशाने माहितीची मागणी करतात. अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जाद्वारे मागणी केलेली बहुतांश माहिती विस्तृत, व्यापक व विश्लेषनात्मक स्वरूपाची असल्याने अर्जदारास सदर माहिती संकलीत करून द्यावयाची झाल्यास त्याचा विपरीत परिणाम दैनंदिन शासकीय कामकाजावर होऊन गरजु व्यक्तीस नैसर्गीक न्याय देता येणे शक्य होत नाही. तसेच शासकीय योजनांची अंमलबजावणी करणे शक्य होत नाही. बहूतांशवेळा अपिलार्थी हे वरिष्ठ कार्यालयाकडे तक्रार अर्ज सादर करतात. सदर तक्रार अर्जाच्या अनुषंगाने वरिष्ठ कार्यालयाकडुन कार्यवाहीबाबत जो पत्रव्यवहार करण्यात येतो त्या पत्रव्यवहाराचा संदर्भ नमुद करून अपिलार्थी क्षेत्रीय स्तरावरील कार्यालयाकडे माहिती अर्ज सादर करतात. बहुतांशवेळा अपिलार्थी यांचा माहिती अर्ज हा वाचनीय नसतो. त्यामुळे त्यांना कोणती माहिती अपेक्षीत आहे याचा बोध होत नाही. अपिलार्थी यांच्या प्राप्त माहिती अर्जाच्या अनुषंगाने सकारात्मक दृष्टीकोन ठेवुन उपलब्ध माहिती अथवा वस्तुस्थिती अपिलार्थी यांना अवगत करण्यात येते. मात्र, माहिती दिलेली असतांना देखील माहिती मिळाली नाही / अपुर्ण माहिती मिळाली / दिशाभुल करणारी माहिती मिळाली अशा कारणांचा नाहक उहापोह करून अपिलार्थी प्रथम व द्वितीय अपील अर्ज सादर करतात. अशा परिस्थितीत अपिलार्थी यांची विचाराधीन द्वितीय अपीले निकाली काढण्यात यावी, अशी विनंती आहे.

३. आज रोजी सुनावणीच्या वेळी उपस्थित प्रथम अपिलीय अधिकारी यांनी कथन केले की, अपिलार्थी यांच्या प्राप्त प्रथम अपील अर्जावर वेळोवेळी सुनावणी घेऊन वस्तुनिष्ठ स्वरूपाचे निर्णय पारीत करण्यात आलेले आहेत. अपिलार्थी यांना नैसर्गिक न्याय तत्वास अनुसरून त्यांची बाजु मांडण्याची संधी दिलेली असतांना अपिलार्थी हे बहुतांशवेळा प्रथम अपिलाच्या सुनावणीकरीता उपस्थित राहत नाहीत. त्यामुळे अपिलार्थी यांच्या मोठ्या प्रमाणावरील प्रथम अपीलाचा विपरीत परिणाम शासनाच्या दैनंदिन शासकीय कामकाजावर होत आहे.

४. प्रस्तुत प्रकरणात आयोगासमक्ष झालेला युक्तीवाद व उपलब्ध कागदपत्रावरून, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन केले असता, विविध विषयाबाबत जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीची मागणी केलेली आहे. अशा परिस्थितीत जन माहिती अधिकारी यांना सर्व अर्जांना ३०

दिवसाच्या आत मुदतीत प्रतिसाद देताना त्याचा शासकीय कामकाजावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. मागणी केलेल्या माहितीतुन काही जनहित साध्य होईल, असे दिसत नाही. अपिलार्थी यांनी या पद्धतीने एका जन माहिती अधिकारी यांचेकडे मोठ्याप्रमाणावर माहितीचे अर्ज करणे ही बाब माहिती अधिकार कायद्याच्या प्रभावी अंमल बजावणीस गतीरोध निर्माण केल्यासारखी असल्याचे स्पष्ट होत आहे. एका व्यक्तीने मोठ्या संख्येने माहिती अधिकार कायद्याखाली माहिती अर्ज/ अपिले करणे माहिती अधिकार कायद्यामध्ये अभिप्रेत /अपेक्षित नाही, यावरुन अपिलार्थी हे माहिती अधिकार कायद्याचा मोठया प्रमाणावर दुरुपयोग करुन संबंधित शासकीय कार्यालय/ प्राधिकरणास वेठीस धरत असुन त्यांच्या या कृतीमुळे संबंधित शासकीय कार्यालये/ प्राधिकरणांचे दैनंदिन कामकाजावर गंभीर परिणाम होण्याचा धोका देखील निर्माण झालेला आहे.

५. अपिलार्थी यांनी कार्यालयाकडे अनेक माहिती अर्ज सादर केलेले आहेत. सार्वजनिक प्राधिकरण हे आपले दैनंदिन कामकाम सांभाळुन माहिती अधिकारात माहिती देण्याचे काम करतात. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६ (१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर या अर्जावर ३० दिवसाच्या मुदतीत कार्यवाही करणे आवश्यक आहे. मात्र एकाच प्राधिकरणाकडे एका पेक्षा जास्त अर्ज प्राप्त झाल्यानंतर या सर्व अर्जावर ३० दिवसाच्या मुदतीत जन माहिती अधिकारी यांना कार्यवाही करणे शक्य होत नाही. आणि याचा विपरित परिणाम कार्यालयीन दैनंदिन कामकाजावर होतो. अशा मोठया प्रमाणावर अर्ज करणाऱ्या व्यक्तीमुळे गरजवंत अर्जदारांवर अन्याय होऊन माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या प्रभावी अंमजबजावणीस गतीरोध निर्माण होतो, असे आयोगाचे मत आहे.

६. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ या प्रस्तावनेमध्ये असे नमूद केले आहे की,

"ज्या अर्थी, लोकशाहीमध्ये माहितगार नागरिक समूह आणि माहितीची पारदर्शकता या बाबी ज्या कार्यशिलतेच्या दृष्टीने, तसेच भ्रष्टाचाराला आळा घालण्याच्या व राज्य शासनाने व त्यांचे यंत्रणा यांना प्रजेला जाब देण्यास उत्तरदायी ठरविण्याच्या दृष्टीने अत्यावश्यक आहेत."

आणि ज्या अर्थी, प्रत्यक्ष व्यवहारात माहितीच्या प्रकटणामुळे अन्य सार्वजनिक हितसंबंधांना तसेच शासनाचे कामकाज कार्यक्षमरित्या चालणे, मर्यादित राजकोषीय साधनसंपत्तीचा इष्टतम वापर होणे आणि संवेदनक्षम माहितीची गोपनियता राखणे, या बाबींनाही बाधा येण्याची शक्यता आहे.

आणि ज्या अर्थी, लोकशाहीच्या आदर्शाची परमोच्यता कायम राखतांना,या परस्परविरोधी हितसंबंधांचा मेळ घालणे आवश्यक आहे. त्या अर्थी, आता माहिती मिळविण्याची इच्छा असणाऱ्या नागरिकांना विविक्षत माहिती पुरविण्याकरिता तरतूद करणे इष्ट होईल. म्हणून शासकीय कामकाज सुचारु व सामोपचाराने चालविणे आणि माहिती अधिकाराचे कामकाजात सुसूत्रता यांचा ताळमेळ घालणे आवश्यक आहे.

७. तसेच अशा प्रकरणासंबंधात मा.सर्वोच्च न्यायालयाने, सिव्हील अपील ६४५४/२०११, दिनांक ०९.०८.२०११ रोजी या प्रकरणी Appealicants Central Board of Secondary Education & Anr. Vs Aditya Bandopadhyay & Ors. Respondents या प्रकरणी खालील आदेश दिले आहेत.

"The Act should not be allowed to misused or abused, or to become a tool to abstract the national development and integration, or to destroy the peace, tranquility and harmony among its citizens. Nor should it be converted into a tool of oppression or intimidation of honest officials striving to the tot do their duty-Nation does not want a scenarios where ७५ % of the staff of public authorities spend ७५ % of their time in collecting and furnishing

दिवसाच्या आत मुदतीत प्रतिसाद देताना त्याचा शासकीय कामकाजावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. मागणी केलेल्या माहितीतुन काही जनहित साध्य होईल, असे दिसत नाही. अपिलार्थी यांनी या पद्धतीने एका जन माहिती अधिकारी यांचेकडे मोठ्याप्रमाणावर माहितीचे अर्ज करणे ही बाब माहिती अधिकार कायद्याच्या प्रभावी अंमल बजावणीस गतीरोध निर्माण केल्यासारखी असल्याचे स्पष्ट होत आहे. एका व्यक्तीने मोठ्या संख्येने माहिती अधिकार कायद्याखाली माहिती अर्ज/ अपिले करणे माहिती अधिकार कायद्यामध्ये अभिप्रेत /अपेक्षित नाही, यावरुन अपिलार्थी हे माहिती अधिकार कायद्याचा मोठया प्रमाणावर दुरुपयोग करुन संबंधित शासकीय कार्यालय/ प्राधिकरणास वेठीस धरत असुन त्यांच्या या कृतीमुळे संबंधित शासकीय कार्यालये/ प्राधिकरणांचे दैनंदिन कामकाजावर गंभीर परिणाम होण्याचा धोका देखील निर्माण झालेला आहे.

५. अपिलार्थी यांनी कार्यालयाकडे अनेक माहिती अर्ज सादर केलेले आहेत. सार्वजनिक प्राधिकरण हे आपले दैनंदिन कामकाम सांभाळुन माहिती अधिकारात माहिती देण्याचे काम करतात. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६ (१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर या अर्जावर ३० दिवसाच्या मुदतीत कार्यवाही करणे आवश्यक आहे. मात्र एकाच प्राधिकरणाकडे एका पेक्षा जास्त अर्ज प्राप्त झाल्यानंतर या सर्व अर्जावर ३० दिवसाच्या मुदतीत जन माहिती अधिकारी यांना कार्यवाही करणे शक्य होत नाही. आणि याचा विपरित परिणाम कार्यालयीन दैनंदिन कामकाजावर होतो. अशा मोठया प्रमाणावर अर्ज करणाऱ्या व्यक्तीमुळे गरजवंत अर्जदारांवर अन्याय होऊन माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या प्रभावी अंमजबजावणीस गतीरोध निर्माण होतो, असे आयोगाचे मत आहे.

६. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ या प्रस्तावनेमध्ये असे नमूद केले आहे की,

"ज्या अर्थी, लोकशाहीमध्ये माहितगार नागरिक समूह आणि माहितीची पारदर्शकता या बाबी ज्या कार्यशिलतेच्या दृष्टीने, तसेच भ्रष्टाचाराला आळा घालण्याच्या व राज्य शासनाने व त्यांचे यंत्रणा यांना प्रजेला जाब देण्यास उत्तरदायी ठरविण्याच्या दृष्टीने अत्यावश्यक आहेत."

आणि ज्या अर्थी, प्रत्यक्ष व्यवहारात माहितीच्या प्रकटणामुळे अन्य सार्वजनिक हितसंबंधांना तसेच शासनाचे कामकाज कार्यक्षमरित्या चालणे, मर्यादित राजकोषीय साधनसंपत्तीचा इष्टतम वापर होणे आणि संवेदनक्षम माहितीची गोपनियता राखणे, या बाबींनाही बाधा येण्याची शक्यता आहे.

आणि ज्या अर्थी, लोकशाहीच्या आदर्शाची परमोच्यता कायम राखतांना,या परस्परविरोधी हितसंबंधांचा मेळ घालणे आवश्यक आहे. त्या अर्थी, आता माहिती मिळविण्याची इच्छा असणाऱ्या नागरिकांना विविक्षत माहिती पुरविण्याकरिता तरतूद करणे इष्ट होईल. म्हणून शासकीय कामकाज सुचारु व सामोपचाराने चालविणे आणि माहिती अधिकाराचे कामकाजात सुसूत्रता यांचा ताळमेळ घालणे आवश्यक आहे.

७. तसेच अशा प्रकरणासंबंधात मा.सर्वोच्च न्यायालयाने, सिव्हील अपील ६४५४/२०११, दिनांक ०९.०८.२०११ रोजी या प्रकरणी Appealicants Central Board of Secondary Education & Anr. Vs Aditya Bandopadhyay & Ors. Respondents या प्रकरणी खालील आदेश दिले आहेत.

"The Act should not be allowed to misused or abused, or to become a tool to abstract the national development and integration, or to destroy the peace, tranquility and harmony among its citizens. Nor should it be converted into a tool of oppression or intimidation of honest officials striving to the tot do their duty-Nation does not want a scenarios where ७५ % of the staff of public authorities spend ७५ % of their time in collecting and furnishing

information to applicants instead of discharging their regular duties. The threat of penalties under the RTI Act and pressure of the authorities under the Act should not lead to employees of a public authorities prioritizing information furnishing, at the cost of their normal and regular duties."

८. एकाच व्यक्तीने मोठया प्रमाणावर केलेल्या माहिती अर्जामुळे शासकीय कामकाजावर विपरीत परिणाम होतो व अशा प्रकारची माहिती जमा करण्यासाठी शासकीय यंत्रणेचा वेळेचा अपव्यय होतो. त्यानुसार प्रस्तुत कायद्याचा मुख्य उद्देश कामकाजात पारदर्शकता, सामान्य जनतेला / नागरीकांना माहिती मिळावी आणि जनतेने माहिती जाणून घेऊन शासकीय कामकाज कार्यक्षम होणे व त्यात समन्वय प्रस्थापित होणे हा आहे. जर अशाप्रकारे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ या कायद्याचा दुरुपयोग झाल्यास निश्चितपणे शासकीय अधिकारी / कर्मचारी यांना मुख्य कार्यालयीन कामकाज सोडुन प्राप्त माहिती अर्जावर अधिनियमाप्रमाणे कामकाज करावे लागेल. त्यामुळे शासकीय यंत्रणेच्या वेळेचा अपव्यय होऊन त्याचा विपरीत परिणाम शासकीय कामकाजावर होईल.

९. अपिलार्थी यांचा माहिती अर्ज पाहता, त्यांनी विस्तृत व मोघम स्वरुपाची माहिती मागितल्याचे दिसून येते. याबाबत मा.उच्च न्यायालय आंधप्रदेश, हैद्राबाद येथील रिट पिटीशन क्र.२०१८२, दिनांक २७.०१.२००९ मध्ये खालील आदेश दिलेले आहेत.

"The Act is an effective device which if utilized judiciously and properly, would help the citizens to become more informed. It no doubt relieves an applicant from obligation to disclose the reason as to why he wants the information. However, indiscriminate efforts to secure information just for the sake of it, and without there being any useful purpose to serve, would only put enormous pressure on the limited human resources, that are available. Diversion of such resources, for this task would obviously, be, at the cost of ordinary functioning. Beyond a point, it may even become harassment, for the concerned agencies. Much needs to be done in this direction to impart a sense of responsibility on those, who want to derive benefit under the Act to be more practical and realistic."

१०. यावरुन माहिती अधिकार कायद्यातंर्गत पुन्हा पुन्हा माहितीची मागणी केल्याने जन माहिती अधिकारी, अपिलाशी संबंधित कर्मचारी, सार्वजनिक प्राधिकरण, प्रथम अपिलीय अधिकारी यांना त्यांचा मौल्यवान वेळ इतर शासकीय कामकाज करण्यासाठी देणे शक्य होत नाही. तसेच पुन्हा तोच विषय व्दितीय अपिलापर्यंत आल्यास माहिती आयोगाला क्रमवारीनुसार प्राप्त झालेल्या इतर व्दितीय अपिलांच्या सुनावणीसाठी वेळ देणे शक्य होत नाही.

उपरोक्त सर्व बाबी तसेच मा.सर्वोच्च न्यायालय, मा.उच्च न्यायालय व मा.केंद्रीय माहिती आयोगाकडील निर्णय विचारात घेता, अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये मागणी केलेल्या माहितीतून कोणतेही व्यापक जनहित साध्य होत असल्याचे स्पष्ट होत नाही. वारंवार मोठ्या प्रमाणात माहितीचे अर्ज करुन मागणी केलेल्या माहितीच्या मागणीमुळे शासकीय यंत्रणेतील मनुष्यबळ व साधन सामग्री यावर ताण येऊन सर्वसामान्य नागरिकांच्या दैनंदिन शासकीय कामे पूर्ण करण्याच्या शासकीय कार्यालयाच्या / प्राधिकरणाच्या क्षमतेवर विपरित परिणाम होऊन शासकीय कामकाजाचा खोळंबा होईल व माहिती अधिकाराच्या प्रभावी अंमलबजावणीस गतिरोध निर्माण होईल

आणि असे माहिती अधिकार कायद्यास अभिप्रेत नाही, असे आयोगाचे स्पष्ट मत झालेले आहे. अपिलाचे सुनावणीचे वेळी आयोगासमोर आलेली संबंधित कागदपत्रे, पुरावे व पत्रव्यवहार विचारात घेवून, सर्व कायदेशीर तरतुदींचे पालन करुन व वर नमुद केलेले मा. सर्वोच्च न्यायालय, उच्च न्यायालय व केंद्रीय माहिती आयोगाने वेळोवेळी दिलेले महत्वपूर्ण निर्णय विचारात घेऊन आयोग खालील प्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

१. अपिलार्थी यांची सर्व १२ द्वितीय अपीले फेटाळण्यात येत आहे.

२. जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, जालना यांना असे निर्देशित करण्यात येते की, प्रस्तुत आदेशाची जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा जालना, यांचे मार्फत व्यापक प्रसिद्धी देण्यात यावी. तसेच सदर आदेश आपल्या अधिनिस्त कार्यालयातील सुचना फलकावर लावून आपल्या स्तरावरून सुद्धा व्यापक प्रसिद्धी देण्यात यावी.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र. 6938 दि. 26/06/2025

नाकारता येत नाही. मागणी केलेल्या माहितीतुन काही जनहित साध्य होईल, असे दिसत नाही. अपिलार्थी यांनी या पद्धतीने एका जन माहिती अधिकारी यांचेकडे मोठ्याप्रमाणावर माहितीचे अर्ज करणे ही बाब माहिती अधिकार कायद्याच्या प्रभावी अंमल बजावणीस गतीरोध निर्माण केल्यासारखी असल्याचे स्पष्ट होत आहे. एका व्यक्तीने मोठ्या संख्येने माहिती अधिकार कायद्याखाली माहिती अर्ज/ अपिले करणे माहिती अधिकार कायद्यामध्ये अभिप्रेत /अपेक्षित नाही, यावरुन अपिलार्थी हे माहिती अधिकार कायद्याचा मोठया प्रमाणावर दुरुपयोग करुन संबंधित शासकीय कार्यालय/ प्राधिकरणास वेठीस धरत असुन त्यांच्या या कृतीमुळे संबंधित शासकीय कार्यालये/ प्राधिकरणांचे दैनंदिन कामकाजावर गंभीर परिणाम होण्याचा धोका देखील निर्माण झालेला आहे.

५. अपिलार्थी यांनी तहसिल कार्यालयाकडे अनेक माहिती अर्ज सादर केलेले आहेत. सार्वजनिक प्राधिकरण हे आपले दैनंदिन कामकाम सांभाळुन माहिती अधिकारात माहिती देण्याचे काम करतात. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६ (१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर या अर्जावर ३० दिवसाच्या मुदतीत कार्यवाही करणे आवश्यक आहे. मात्र एकाच प्राधिकरणाकडे एका पेक्षा जास्त अर्ज प्राप्त झाल्यानंतर या सर्व अर्जावर ३० दिवसाच्या मुदतीत जन माहिती अधिकारी यांना कार्यवाही करणे शक्य होत नाही. आणि याचा विपरित परिणाम कार्यालयीन दैनंदिन कामकाजावर होतो. अशा मोठया प्रमाणावर अर्ज करणाऱ्या व्यक्तीमुळे गरजवंत अर्जदारांवर अन्याय होऊन माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या प्रभावी अंमजबजावणीस गतीरोध निर्माण होतो, असे आयोगाचे मत आहे.

६. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ या प्रस्तावनेमध्ये असे नमूद केले आहे की,

"ज्या अर्थी, लोकशाहीमध्ये माहितगार नागरिक समूह आणि माहितीची पारदर्शकता या बाबी ज्या कार्यशिलतेच्या दृष्टीने, तसेच भ्रष्टाचाराला आळा घालण्याच्या व राज्य शासनाने व त्यांचे यंत्रणा यांना प्रजेला जाब देण्यास उत्तरदायी ठरविण्याच्या दृष्टीने अत्यावश्यक आहेत."

आणि ज्या अर्थी, प्रत्यक्ष व्यवहारात माहितीच्या प्रकटणामुळे अन्य सार्वजनिक हितसंबंधांना तसेच शासनाचे कामकाज कार्यक्षमरित्या चालणे, मर्यादित राजकोषीय साधनसंपत्तीचा इष्टतम वापर होणे आणि संवेदनक्षम माहितीची गोपनियता राखणे, या बाबींनाही बाधा येण्याची शक्यता आहे.

आणि ज्या अर्थी, लोकशाहीच्या आदर्शाची परमोच्यता कायम राखतांना,या परस्परविरोधी हितसंबंधांचा मेळ घालणे आवश्यक आहे. त्या अर्थी, आता माहिती मिळविण्याची इच्छा असणाऱ्या नागरिकांना विविक्षत माहिती पुरविण्याकरिता तरतूद करणे इष्ट होईल. म्हणून शासकीय कामकाज सुचारु व सामोपचाराने चालविणे आणि माहिती अधिकाराचे कामकाजात सुसूत्रता यांचा ताळमेळ घालणे आवश्यक आहे.

७. तसेच अशा प्रकरणासंबंधात मा.सर्वोच्च न्यायालयाने, सिव्हील अपील ६४५४/२०११, दिनांक ०९.०८.२०११ रोजी या प्रकरणी Appealicants Central Board of Secondary Education & Anr. Vs Aditya Bandopadhyay & Ors. Respondents या प्रकरणी खालील आदेश दिले आहेत.

"The Act should not be allowed to misused or abused, or to become a tool to abstract the national development and integration, or to destroy the peace, tranquility and harmony among its citizens. Nor should it be converted into a tool of oppression or intimidation of honest officials striving to the tot do their duty-Nation does not want a scenarios where ७५ % of the staff of public authorities spend ७५ % of their time in collecting and furnishing information to applicants instead of discharging their regular duties. The threat of penalties

under the RTI Act and pressure of the authorities under the Act should not lead to employees of a public authorities prioritizing information furnishing, at the cost of their normal and regular duties."

८. एकाच व्यक्तीने मोठया प्रमाणावर केलेल्या माहिती अर्जामुळे शासकीय कामकाजावर विपरीत परिणाम होतो व अशा प्रकारची माहिती जमा करण्यासाठी शासकीय यंत्रणेचा वेळेचा अपव्यय होतो. त्यानुसार प्रस्तुत कायद्याचा मुख्य उद्देश कामकाजात पारदर्शकता, सामान्य जनतेला / नागरीकांना माहिती मिळावी आणि जनतेने माहिती जाणून घेऊन शासकीय कामकाज कार्यक्षम होणे व त्यात समन्वय प्रस्थापित होणे हा आहे. जर अशाप्रकारे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ या कायद्याचा दुरुपयोग झाल्यास निश्चितपणे शासकीय अधिकारी / कर्मचारी यांना मुख्य कार्यालयीन कामकाज सोडुन प्राप्त माहिती अर्जावर अधिनियमाप्रमाणे कामकाज करावे लागेल. त्यामुळे शासकीय यंत्रणेच्या वेळेचा अपव्यय होऊन त्याचा विपरीत परिणाम शासकीय कामकाजावर होईल.

९. अपिलार्थी यांचा माहिती अर्ज पाहता, त्यांनी विस्तृत व मोघम स्वरुपाची माहिती मागितल्याचे दिसून येते. याबाबत मा.उच्च न्यायालय आंधप्रदेश, हैद्राबाद येथील रिट पिटीशन क्र.२०१८२, दिनांक २७.०१.२००९ मध्ये खालील आदेश दिलेले आहेत.

"The Act is an effective device which if utilized judiciously and properly, would help the citizens to become more informed. It no doubt relieves an applicant from obligation to disclose the reason as to why he wants the information. However, indiscriminate efforts to secure information just for the sake of it, and without there being any useful purpose to serve, would only put enormous pressure on the limited human resources, that are available. Diversion of such resources, for this task would obviously, be, at the cost of ordinary functioning. Beyond a point, it may even become harassment, for the concerned agencies. Much needs to be done in this direction to impart a sense of responsibility on those, who want to derive benefit under the Act to be more practical and realistic."

१०. यावरुन माहिती अधिकार कायद्यातंर्गत पुन्हा पुन्हा माहितीची मागणी केल्याने जन माहिती अधिकारी, अपिलाशी संबंधित कर्मचारी, सार्वजनिक प्राधिकरण, प्रथम अपिलीय अधिकारी यांना त्यांचा मौल्यवान वेळ इतर शासकीय कामकाज करण्यासाठी देणे शक्य होत नाही. तसेच पुन्हा तोच विषय व्दितीय अपिलापर्यंत आल्यास माहिती आयोगाला क्रमवारीनुसार प्राप्त झालेल्या इतर व्दितीय अपिलांच्या सुनावणीसाठी वेळ देणे शक्य होत नाही.

उपरोक्त सर्व बाबी तसेच मा.सर्वोच्च न्यायालय, मा.उच्च न्यायालय व मा.केंद्रीय माहिती आयोगाकडील निर्णय विचारात घेता, अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये मागणी केलेल्या माहितीतून कोणतेही व्यापक जनहित साध्य होत असल्याचे स्पष्ट होत नाही. वारंवार मोठ्या प्रमाणात माहितीचे अर्ज करुन मागणी केलेल्या माहितीच्या मागणीमुळे शासकीय यंत्रणेतील मनुष्यबळ व साधन सामग्री यावर ताण येऊन सर्वसामान्य नागरिकांच्या दैनंदिन शासकीय कामे पूर्ण करण्याच्या शासकीय कार्यालयाच्या / प्राधिकरणाच्या क्षमतेवर विपरित परिणाम होऊन शासकीय कामकाजाचा खोळंबा होईल व माहिती अधिकाराच्या प्रभावी अंमलबजावणीस गतिरोध निर्माण होईल आणि असे माहिती अधिकार कायद्यास अभिप्रेत नाही, असे आयोगाचे स्पष्ट मत झालेले आहे. अपिलाचे

सुनावणीचे वेळी आयोगासमोर आलेली संबंधित कागदपत्रे, पुरावे व पत्रव्यवहार विचारात घेवून, सर्व कायदेशीर तरतुदींचे पालन करुन व वर नमुद केलेले मा. सर्वोच्च न्यायालय, उच्च न्यायालय व केंद्रीय माहिती आयोगाने वेळोवेळी दिलेले महत्वपूर्ण निर्णय विचारात घेऊन आयोग खालील प्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

१. अपिलार्थी यांची सर्व १६ द्वितीय अपीले फेटाळण्यात येत आहे.

२. जिल्हाधिकारी, जालना यांना असे निर्देशित करण्यात येते की, प्रस्तुत आदेशाची जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा जालना, यांचे मार्फत व्यापक प्रसिद्धी देण्यात यावी. तसेच सदर आदेश आपल्या अधिनिस्त कार्यालयातील सुचना फलकावर लावुन आपल्या स्तरावरून सुद्धा व्यापक प्रसिद्धी देण्यात यावी.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र. 6939 दि. 26/06/2025

प्रत, माहितीसाठी तथा यथाशिघ्र कार्यवाहीसाठी अग्रेषित
जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक - ८७८/२०२४
बोर्ड क्र. ७८

श्रीप्रल्हाद माधवराव केदार, — अपिलार्थी
रा.दलाल लेआऊट, जिजामाता नगर, प्लॉट नं.१०५,
प्रफुल्ल निवास, बुलढाणा.

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा दुय्यम निबंधक श्रेणी-१, कार्यालय जाफ्राबाद जि.जालना : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा सह दुय्यम निबंधक, कार्यालय जाफ्राबाद जि.जालना : उत्तरवादी क्र.२

## (सुनावणी दिनांक १७.०६.२०२५)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी , जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दि.२८.०९.२०२४ रोजीच्या माहिती अर्जाद्वारे प्लॉट खरेदीविक्री बाबत माहिती मागितलेली आहे.

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी कथन केले की, माहिती अर्जाच्या अनुषंगाने आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करून दिलेली नाही. सदर माहिती उपलब्ध करून देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी कथन केले की, अपिलार्थी यांना माहिती अर्जान्वये दि.२५.१०.२०२४ रोजीच्या पत्रान्वये माहितीसंदर्भात कळविण्यात आलेले आहे. तसेच अपिलार्थी यांच्या दाखल प्रथम अपीलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.२२.११.२०२४ रोजी सुनावणी घेऊन पारीत केलेल्या आदेशानुसार दि.३०.१२.२०२४ रोजीच्या पत्रान्वये नोंदणीकृत टपालाद्वारे पाठविण्यात आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, सुनावणी दरम्यान झालेला युक्तीवाद व आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दि.२५.१०.२०२४ रोजीच्या पत्राद्वारे कलम २(च) नुसार माहिती नाकारलेली दिसुन येत आहे. अपिलार्थी यांच्या दाखल प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन मुद्दा क्र.२ ची माहिती व नोंदणी कायदा, १९०८ व महाराष्ट्र नोंदणी

नियम, १९६१ ची प्रत नोंदणी संबंधित परिपत्रके, शासन निर्णय याबाबतची माहिती ३० दिवसात अपिलार्थी यांना उपलब्ध करून देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. सदर आदेशानुसार जन माहिती अधिकारी यांनी दि.३०.१२.२०२४ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन दिल्याचे दिसुन येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 7390 दिनांक :- 02/07/2025

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक - ५४२/२०२४
बोर्ड क्र. ७९

श्री.राजु रामनाथ उबाळे, — अपिलार्थी
रा.खडकेश्वर, ता.अंबड जि.जालना.

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी कार्यालय, अंबड जि.जालना : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी कार्यालय, अंबड जि.जालना : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक १७.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दि.०२.११.२०२३ रोजीच्या माहिती अर्जाद्वारे सन २०१९ ते २०२३ पर्यंतची पंतप्रधान योजनेअंतर्गत फळबाग दाळींबची फसलविमा लाभार्थी यांना कशाआधारे लाभ दिला याची चौकशी करून गट नं.निहाय लेखी माहिती मिळणेबाबत माहिती मागितलेली आहे.

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी कथन केले की, माहिती अर्जाच्या अनुषंगाने आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करून दिलेली नाही. सदर माहिती उपलब्ध करून देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, सुनावणी दरम्यान झालेला युक्तीवाद व आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाद्वारे त्रोटक, विस्तृत व मोठ्या कालावधीची माहिती मागितलेली दिसुन येत आहे. अशी माहिती एकत्रीत करण्याकरीता सार्वजनीक प्राधिकरणाकडील मणुष्यबळ व साधनसामग्री मोठया प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब कलम ७(९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भुमिका व उद्दीष्ट सफल होत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

उपरोक्तनुसार द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.---7391--- दिनांक :---02/07/2025

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक - १०६१४/२०२४
बोर्ड क्र. ८०

श्री.सुनिल रामभाऊ गायकवाड,
रा.नळविहीरा पो.हिवरा(काबली),
ता.जाफ्राबाद जि.जालना. — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी, — : उत्तरवादी क्र.१
उप विभागीय कृषी अधिकारी कार्यालय, परतुर जि.जालना

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय कृषी अधिकारी, — : उत्तरवादी क्र.२
उप विभागीय कृषी अधिकारी कार्यालय, परतुर जि.जालना

**(सुनावणी दिनांक १७.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहे. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दि.१२.०७.२०२४ रोजीच्या माहिती अर्जाद्वारे पोकरा योजनेतुन शेडनेट घटकांचे वितरीत अनुदानाची सत्यता पडताळणीबाबत माहिती मागितलेली आहे.

आज रोजी सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी कथन केले की, अपिलार्थी यांना माहिती अर्जान्वये दि.१६.१०.२०२४ रोजीच्या पत्रान्वये माहिमी उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, सुनावणी दरम्यान झालेला युक्तीवाद व आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दि.१६.१०.२०२४ रोजीच्या पत्राद्वारे माहिती उपलब्ध करुन दिल्याचे दिसुन येत आहे. ही बाब विचारात घेता, विचाराधिन द्वितीय अपील निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 7392 दिनांक :- 02/07/2025

**राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले द्वितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर -४३१००१

श्री.सय्यद साबेर सय्यद सरदार, : अपिलार्थी
रा.हीना मंजील, नुर कॉलनी, टाऊन हॉल, छत्रपती संभाजीनगर.

विरुध्द

| बोर्ड क्र. | द्वितीय अपील क्र. | जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचा तपशिल | | |
|---|---|---|---|---|
| ८१ | २९७/२०२४ | जन माहिती अधिकारी तथा मालमत्ता अधिकारी, महानगरपालीका, छ.संभाजीनगर | उत्तरवादी क्र.१ | उपस्थित |
| | | प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त(मालमत्ता विभाग), महानगरपालीका, छत्रपती संभाजीनगर | उत्तरवादी क्र.२ | उपस्थित |
| ८२ | १५९२/२०२४ | जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, झोन क्र.०१, महानगरपालीका, छत्रपती संभाजीनगर | उत्तरवादी क्र.१ | उपस्थित |
| | | प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महानगरपालीका, छ. संभाजीनगर | उत्तरवादी क्र.२ | उपस्थित |
| ८३ | १६०८/२०२४ | जन माहिती अधिकारी तथा सह दुय्यम निबंधक वर्ग-२, नोंदणी व मुद्रांक विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, छत्रपती संभाजीनगर. | उत्तरवादी क्र.१ | उपस्थित |
| | | प्रथम अपिलीय अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-१, मुद्रांक जिल्हाधिकारी, नोंदणी व मुद्रांक विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, छत्रपती संभाजीनगर. | उत्तरवादी क्र.२ | अनुपस्थित |
| ८४ | २३१८/२०२४ | जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, जलनिसारण विभाग, महानगरपालीका, छत्रपती संभाजीनगर | उत्तरवादी क्र.१ | अनुपस्थित |
| | | प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जलनिसारण विभाग, महानगरपालीका, छत्रपती संभाजीनगर | उत्तरवादी क्र.२ | प्रतिनिधी उपस्थित |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ८५ | २४४६/२०२४ | जन माहिती अधिकारी तथा सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर<br>प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर | उत्तरवादी क्र.१<br>उत्तरवादी क्र.२ | उपस्थित<br>उपस्थित |
| ८६ | २५२०/२०२४ | जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार(सामान्य शाखा), जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर<br>प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार (सामान्य शाखा), जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर | उत्तरवादी क्र.१<br>उत्तरवादी क्र.२ | अनुपस्थित<br>उपस्थित |
| ८७ | ५८१४/२०२४ | जन माहिती अधिकारी तथा अतिरिक्त कार्यकारी अभियंता, महावितरण विभाग क्र.०१, छत्रपती संभाजीनगर<br>प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महावितरण विभाग क्र.१, छत्रपती संभाजीनगर | उत्तरवादी क्र.१<br>उत्तरवादी क्र.२ | अनुपस्थित<br>अनुपस्थित |
| ८८ | ६२५९/२०२४ | जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, छत्रपती संभाजीनगर<br>प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, छत्रपती संभाजीनगर. | उत्तरवादी क्र.१<br>उत्तरवादी क्र.२ | अनुपस्थित<br>अनुपस्थित |
| ८९ | ७००३/२०२४ | जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, यांत्रिक विभाग, घनकचरा महानगरपालीका, छत्रपती संभाजीनगर<br>प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त, घनकचरा, महानगरपालीका, छ. संभाजीनगर | उत्तरवादी क्र.१<br>उत्तरवादी क्र.२ | उपस्थित<br>अनुपस्थित |

**(सुनावणी दिनांक १७.०६.२०२५)**

## निर्णय

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपिल दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. आज रोजी सुनावणी करीता अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी एकुण ९ माहिती अर्जाद्वारे खालीलप्रमाणे माहिती मागितल्याचे दिसुन येत आहे.

| बोर्ड क्र. | द्वितीय अपील क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहितीचा विषय |
|---|---|---|---|
| ८१ | २९७/२०२४ | दि.२९.०८.२०२३ | कॅनॉट गार्डन सिडको, छत्रपती संभाजीनगर येथे महानगरपालीका तर्फे देण्यात आलेल्या पे पार्कींग जागा करारनामा व नकाशाबाबत. |
| ८२ | १५९२/२०२४ | दि.२०.११.२०२३ | सिमेंट रोड व डांबर रोड बाबत. |
| ८३ | १६०८/२०२४ | दि.२६.१२.२०२३ | तक्रारीवरील चौकशी अहवालबाबत. |
| ८४ | २३१८/२०२४ | दि.०५.१.२०२४ | शौचालय करारनाम्याबाबत. |
| ८५ | २४४६/२०२४ | दि.०५.०१.२०२४ | अंतोदय व BPL राशन कार्ड धारकाचे नाव, नंबर व पत्ता इत्यादीबाबत. |
| ८६ | २५२०/२०२४ | दि.०५.०१.२०२४ | जिल्हाधिकारी कार्यालय, छ.संभाजीनगर परिसरमधील हॉटेल, झेरॉक्स दुकाने, वाहन पार्कींग इत्यादीबाबत. |
| ८७ | ५८१४/२०२४ | दि.२२.०२.२०२४ | नविन मिटर विद्युत मिटर कनेक्शन घेणेकरीता लागणारी सर्व कागदपत्रांबाबत. |
| ८८ | ६२५९/२०२४ | दि.१८.०३.२०२४ | नविन पाणी लाईनबाबत. |
| ८९ | ७००३/२०२४ | दि.०१.०४.२०२४ | सर्व वाहन प्रदुषण प्रमाणपत्र व विमा आणि फिटनीसबाबत. |

आज रोजी सुनावणी दरम्यान उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी कथन केले की, अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने माहिती उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. बोर्ड क्र.८९ मधील माहिती अर्जाच्या अनुषंगाने जनमाहिती अधिकारी यांनी नियमाप्रमाणे माहितीच्या शुल्काचा भरणा करून माहिती प्राप्त करून घेणेबाबत कळविलेले आहे. तथापि अपिलार्थी यांनी शुल्काचा भरणा केलेला नाही. अपिलार्थी यांच्या दाखल प्रथम अपीलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केलेला आहे. त्यामुळे विचाराधिन द्वितीय अपील निकाली काढण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात आज रोजी सुनावणी दरम्यान झालेला युक्तीवाद व उपलब्ध अभिलेखावरून, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करून दिल्याचे दिसुन येत आहे. अपिलार्थी यांच्या दाखल प्रथम अपीलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अधिनियमातील तरतुदीनुसार सुनावणी घेऊन निर्णय पारीत केल्याचे दिसुन येत आहे. आज रोजी सुनावणी करीता अपिलार्थी गैरहजर आहेत. तथापि त्यांनी आयोगाकडील दाखल द्वितीय अपील प्रयोजनामध्ये माहिती मिळाली नाही, अपील सुनावणी झाली नाही, असे कारण नमुद केलेले आहे. प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती व जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद आणि प्रथम अपिलीय अधिकारी यांनी पारीत केलेले प्रथम अपील आदेश तसेच उपलब्ध कागदपत्रे विचारात घेता, अपिलार्थी यांच्या द्वितीय अपील प्रयोजनामध्ये आयोगास कोणतेही तथ्यांश दिसुन येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

प्रिशांद

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र. 6919 दि. 26/06/2025

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक - ३६०२/२०२३
बोर्ड क्र.९०

श्री. गजानन कानडे
रा. हनुमान मंदीराजवळ, श्रीनगर, नांदेड — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा सहायक प्रशासन अधिकारी,,
विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
गटविकास अधिकारी(प्रशासन),
विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक १७.०६.२०२५)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहे. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| दि.१३.०२.२०२३ | श्रीमती टी.आर.पुरी, कनिष्ठ सहायक एकात्मीक बाल विकास सेवा योजना प्रकल्प, भोकर यांची नांदेड कार्यालयात झालेल्या प्रतिनियुक्ती आदेश संचिकाबाबत. |

आज रोजी सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी कथन केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्रयस्थ कर्मचारी यांचेशी संबंधित आहे. अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी माहिती / वस्तुस्थिती उपलब्ध करून दिली किंवा कसे अभिलेखावरून ज्ञात होत नाही. तथापि अपिलार्थी यांना माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली माहिती / माहिती संदर्भातील वस्तुस्थिती आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे वर्तमान जनमाहिती अधिकारी या नात्याने उपलब्ध करून देण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाद्वारे मागितलेली माहिती ही त्रयस्थ पक्षाशी संबंधित असल्याचे दिसुन येत आहे. त्रयस्थ पक्षाशी संबंधित माहितीची मागणी केल्यानंतर कलम ११(१) नुसार त्रयस्थ पक्षास त्यांची बाजु मांडण्याची संधी देणे ही बाब नैसर्गिक न्याय व पारदर्शकतेच्या दृष्टीकोनातुन योग्य ठरते. यानंतर माहिती प्रगट करणे व्यापक जन हिताच्या कसोटीवर उतरत

असल्यास अशी माहिती प्रगट करणे आवश्यक आहे. आज रोजी सुनावणी करीता अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तथापि माहिती अर्जाद्वारे मागितलेली माहिती उघड केल्यामुळे नेमके कोणते व्यापक जनहित साध्य होऊ शकते याबाबत त्यांनी त्यांच्या द्वितीय अपीलामध्ये काहीही नमुद केलेले नाही. सारांशाने, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती अधिनियमतील कलम ८(१)(त्र) मधील व्यापक जनहिताच्या कसोटीवर उतरत नसल्यामुळे ती अपिलार्थीस देय होणार नाही, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.- 6 7378 दिनांक :- 08/07/2025